|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

वर्ष : १३ अंक : १७ सोमवार दि. ५ मे २०२५ ते रविवार दि. ११ मे २०२५ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## व्यसनी मुलाचे डोके फिरले दारूसाठी आईला ठार मारले

बीड/क्राईम रिपोर्टर

दारूचे व्यसन असलेला माणूस दारूसाठी काहीही करू शकतो. दारू नसेल तर तो वेडापिसा होतो. दारूसाठी खोटे बोलतो, दारूसाठी चोऱ्या करतो आणि दारूसाठी एखाद्याचा खूनही करतो. अशावेळी तो नाती गोती सुद्धा बघत नाही. बीड जिल्ह्यातील येल्डा गावात अशाच एका घटनेत दारूसाठी एकाने जन्मदात्य आईची हत्या केली. या प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील येल्डा येथे रात्री बारा वाजताच्या ...पान २ वर

## चौथ्या मुलीचे जीवन अल्पजीवी ठरले जन्मदात्या आईनेच गळा दाबून मारले






डहाणू/क्राईम रिपोर्टर

शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात अजूनही वैचारिक सुधारणेची गंगा तळागाळापर्यंत पोहचलेली नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांची मानसिकता पूर्वीसारखीच बुरसटलेली आणि परंपरांच्या गर्तेत अडकलेली आहे. त्यातूनच मुलगा म्हणजे वंशाचा दिवा आणि मुलगी म्हणजे आई वडिलांसाठी ओझ असा समज कायम आहे. हा समज दूर करण्यासाठी सरकारने अनेक प्रयत्न केले. बेटी बचाव बेटी पढाव सारख्या योजना राबवल्या. मुलीच्या जन्मापासून तिचे शिक्षण आणि लाग्ना पर्यत मुलीच्या कुटुंबियांना सरकारकडून वेगवेगळ्या प्रकारची मदत दिली जाते. मुलगा आणि मुलीमध्ये काही फरक नाही. मुलगी सुद्धा मुला इतकीच कर्तुत्ववान बनून पालकांच्या वृद्धापकाळात त्यांचा आधार बनू शकते हे समाजाला पटवून देण्यासाठी गावागावत जनजागृती करण्यात आली. इतकेच नव्हे तर मुलीच्या शिक्षण, रोजगार आणि सुरक्षिततेसाठी कायदे बनवण्यात आले. गर्भधारणा झाल्यानंतर गर्भात मुलगी असेल तर गर्भात केला जायचा त्यामुळे लाखो मुलीना गर्भातच मारले जायचे. हा अत्यंत संतापजनक प्रकार होता. त्यामुळे सरकारने गर्भलिंग चाचणी विरोधी कायदा केला. पण दुर्दैवाने सरकारकडून केल्या गेलेल्या या सर्व प्रयत्नांना अजूनही फारसे यश आलेले नाही. कारण मुलीच्या जन्माबाबाटची समाजाची मानसिकता अजूनही बदललेली नाही. त्यामुळे मुलीची नकोशी ही ओळख आजही काही ठिकाणी कायम आहे. जिजाबाई, अहिल्याबाई, राणी लक्ष्मीबाई, इंदिरा गांधी, अशा कितीतरी कर्तुत्ववान महिलांची उदाहरणे समोर असताना लोकना मुलीपेक्षा मुलगा अधिक कर्तुत्ववान वाटतो. त्यामुळे मुलगाच जन्माला यायला हवा असा गर्भवती महिलेवर सासरच्या मंडळींचा दबाव असतो. आणि याच दबावातून तिच्यावर ९ महिने उदरात बाळगून जन्माला घातलेल्या मुलीचा स्वतःच्या हाताने जीव घेण्याची तिच्यावर पाळी येते. पालघर जिल्ह्यातील डहाणू येथे ३ मुलींच्या पाठीवर चौथी मुलगी झाली म्हणून एका महिलेने तिचे तोंड दाबून पोटच्या मुलीची हत्या केली. या प्रकरणी तिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पश्चिम बंगाल येथून डहाणू शहरातील लोणीपाडा येथे आई–वडिलांकडे आलेल्या पूनम शहा हिने चौथे अपत्य मुलगी झाल्याने तिचे नाकतोंड दाबून जीव घेतला. हा प्रकार डहाणू उपजिल्हा रुग्णालयात शनिवारी मध्यरात्री घडला. याबाबत डहाणू पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पश्चिम बंगाल येथे राहणारी पूनम शहा ही महिला गेल्या काही दिवसांपूर्वी डहाणू लोणी पाडा येथे राहणाऱ्या आपल्या आईच्या घरी प्रसुतीसाठी आली होती. या महिलेची मागील आठवड्यात लोणीपाडा येथे सुरक्षितरित्या गृह प्रसूती झाली होती. त्यानंतर तिला बाळासह डहाणू उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अगोदर तिला तीन मुली असल्याने चौथे अपत्य पुन्हा मुलगी झाली या नैराश्यतेतून तिने २६ एप्रिल च्या मध्यरात्री बाळाच्या नाकातोंडावर हाताचा पंजा ठेऊन जीव घेतला. या घटनेत बाळाचा गुदमरून मृत्यू झाला, त्याबाबत डहाणू पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नैराश्यपोटी हे पाऊल उचलण्याची माहिती तिने पोलिस चौकशीत दिली. पुनम शहा हिचे ...पान २ वर

## जमिनीचा वाद अखेर विकोपाला गेला चुलत भावानेच सुनीलचा खून केला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



संपत्तीचा वाद माणसाला नातीगोती विसरायला लावतो. हा वाद एका पिढीत मिटला नाही तर पुढच्या पिढ्याही या वादाच्या चक्रव्युहात अडकल्या जातात. आणि त्यातून एखाद्याचा प्राणावरही बेतू शकते. जळगाव जिल्ह्याच्या टाकळीमध्ये अशीच एक घटना घडली. चव्हाण कुटुंबातील तीन भावांपैकी दोघांचा मृत्यू झाल्यावर त्याच्या मुलांनी वडिलोपार्जित संपतीत हयात असलेल्या चुलत्याकडे हिस्सा मागितला. पण चुलत्याच्या मुलाने म्हणजे चुलत भावाने हिस्सा देण्यास नकार देताच चुलत भावांमध्ये वाद सुरु झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की प्रवीण चव्हाण याने त्याचा चुलत भाऊ सुनील चव्हाण याची हत्या केली. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे.







जळगाव जिल्ह्याच्या मुक्ताईनगर तालुक्यात पुर्वजांनी कमावलेल्या शेतजमीनीच्या वादातून एका तरुणाने त्याच्या चुलतभावाचा खून केल्याची घटना घडली. शेतजमीनीचा वाद या खूनाच्या घटनेसाठी माध्यम ठरला. जळगाव जिल्हा आणि मध्य प्रदेश राज्याच्या सिमेवर वसलेल्या मुक्ताईनगर तालुक्यात टाकळी हे गाव आहे. या गावातील चव्हाण परिवारात रामसिंग, जयसिंग आणि जगन हे तिन







भाऊ रहात होते. त्यापैकी रामसिंग आणि जयसिंग हे दोघे भाऊ काही वर्षापुर्वी मयत झाले आहेत. या तिघा भावांपैकी केवळ जगन चव्हाण हा एकच भाऊ आजच्या घडीला हयात आहे. स्वर्गवासी रामसिंग चव्हाण यांना चार मुले आहेत. संजय रामसिंग चव्हाण, अनिल रामसिंग चव्हाण, गोविंदा रामसिंग चव्हाण आणि सुनिल रामसिंग चव्हाण अशी त्यांची नावे आहेत. स्व. रामसिंग चव्हाण यांचा हयात असलेला भाऊ जगन चव्हाण यांना प्रविण जगन चव्हाण आणि राहुल जगन चव्हाण ही दोन मुले आहेत. चव्हाण परिवाराची परंपरागत शेती मुक्ताईनगर तालुक्यातील महालखेडा आणि टाकळी शिवारात आहे. ठरल्याप्रमाणे वडीलोपार्जीत परंपरागत शेती जगन चव्हाणयांच्यासहत्यांची मुले आणि स्व. रामसिंग व स्व. जयसिंग या दोघांची मुले कसत होते. काळाची पावले पुढे पुढे ...पान २ वर

## मोटार सायकलवरून पाठलाग केला दारू विक्रेत्यामुळे पोलिसाचा जीव गेला

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



मयत भागवत

दारू विक्रेते हे निर्ढावलेले असतात आणि दारूचा अवैध धंदा करताना पोलिसांबरोबर नेहमीच त्यांचा संघर्ष होत असतो. मात्र या संघर्षात एका बहादूर पोलिसाला त्याचा जीव गमवावा लागला. बुलढाणा जिल्ह्याच्या देऊळगाव हुबे येथे दारू विक्रेत्याचा मोटार सायकल वरून पाठलाग करीत असताना त्या विक्रेत्याने पोलिसांच्या भरधाव बाईकवर लाथ मारल्याने बाईक रस्त्यावर उलटून झालेल्या अपघातात भागवत गिरी या पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी आरोपी दारू विक्रेत्यास पोलिसांनी अटक केली आहे.



आरोपी संजय

गुन्हेगारीवर अंकुश आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. काही जणांमुळे वर्दीला डाग लागत असला तरी बहुतांशी पोलीस अधिकारी व कर्मचारी कर्तव्यात कसूर करत नाहीत. प्रसंगी जीव धोक्यात घालून पोलीस गुन्हेगारांच्या मुसक्या आवळतात. त्यातूनच काही वेळा कर्तव्य बजावतांना एखाद्या कर्मचाऱ्याला जीवही गमवावा लागतो. बुलढाणा ...पान २ वर

## कर्जाच्या वसुलीने अंजनाचा घात केला सावकार महिलेच्या मारहाणीत जीव गेला



मयत अंजना





संशयित आरोपी ज्योती व सुहानी

बेळगावी/क्राईम रिपोर्टर

कर्जाची रक्कम वेळेवर परत केली नाही तर असे व्यवहार घातक ठरू शकतो. कारण कर्जाच्या वसुलीच्या वादातून काहींना जीव गमवावा लागला आहे. बेळगावच्या लक्ष्मीनगर येथील अंजना दड्डीकर या महिलेचे असेच झाले. तिने शेजाऱ्याकडून मुलीच्या लग्नासाठी १५ हजार कर्ज घेतले, पण कोरोन काळात पतीचे काम बंद पडल्याने कर्जाचे आणि व्याजाचे हप्ते वेळेवर देता आले नाही. त्यामुळे १५ हजारांच्या कर्जाचे ४५ हजार झाले. त्यावरून सावकार महिलेशी तिचे भांडण होऊ लागले. आणि एकेदिवशी सावकार महिला वसुलीसाठी तिच्या घरी आल्या. यावेळीही दोघींमध्ये जोरदार भांडण झाले, याच भांडत सावकार महिलेने आणि तिच्या मुलीने अंजनाला केलेल्या मारहाणीत तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मायलेकींना अटक केली आहे.

बेळगावी येथील लक्ष्मीनगर गणेशपुर येथे अजित दड्डीकर हे पत्नी अंजना सह राहयला आहे. अजित हे आपल्या उदरनिर्वाहासाठी ॲटो रिक्षा चालवितात तर अंजना या गृहिणी आहेत. त्याच्या दोन्ही मुलीचे लग्न झाले असल्याने त्या त्याच्या सासरी राहत आहेत. अंजना दड्डीकर (वय ५४) वर्ष याचे कोणाशी कसलेच भांडण नव्हते. त्या सरळ साध्या सरळमार्गी स्वभावाच्या होत्या. त्याचे ...पान २ वर

## मासिक पाळीतील स्वयंपाक प्राणावर बेतला नणंद आणि सासूने विवाहितेचा जीव घेतला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत गायत्री

सामाजिक दृष्ट्या प्रगल्भ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रामये रूढी परंपरा जपल्या जातात. त्यामुळे ग्रामीण भागात आजही बुरसटलेल्या विचारांचे काही लोक आहेत. जळगाव जिल्ह्याच्या किनोद गावात मासिक पाळीमध्ये स्वयंपाक केला म्हणून एका महिलेला सासू आणि नणंदेने गळा दाबून ठार मारले आणि तिने आत्महत्या केल्याचा बनाव केला. ही घटना घडल्यानंतर मृत गायत्री हिचा पती, सासू आणि नणंद फरार झाले आहेत. आता दोषींवर गुन्हा दाखल होईपर्यंत हा मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा गायत्री हिच्या नातेवाईकांनी घेतला आहे.

मासिक पाळीबाबत पाळल्या जाणाऱ्या अशाच विटाळातून एका विवाहितेचा जीव गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. जळगाव जिल्ह्यातील किनोद या गावात गायत्री कोळी या २६ वर्षीय विवाहितेने गुरुवारी गळफास घेऊन जीवन संपलं होतं. मात्र या महिलेची तिची सासू आणि नणंदेने मिळून हत्या केल्याचा आरोप तिच्या माहेरच्या नातेवाईकांनी केला आहे. गायत्र कोळी ही महिला किनोद या गावात पती आणि सासू आणि दोन मुलांसर वास्तव्यास होती. तिच्या पतीचा भाजी विक्रीचा व्यवसाय ...पान २ वर

## नरेंद्र सुडाने भयंकर पेटला पार्टीत प्रशांतचा जीव घेतला



मयत प्रशांत



कोल्हापुर/क्राईम रिपोर्टर

दारूच्या पार्टीत नेहमीच वाद होतात. पण असे वाद नेहमीचेच असल्याने दारू उतरल्यावर ते विसरून जातात. पण काही लोक मात्र असे विसरत नाहीत, त्यांच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि त्यातून ते मैत्रीचाही विचार करीत नाही. संधी मिळताच सूड घेतात. कोल्हापुरातील नरेंद्र साळोखे आणि प्रशांत कुंभार यांच्यात असाच दारूच्या पार्टीत वाद झाला होता. या वादातून दोघांनीही एकमेकांना धमक्या दिल्या होत्या. त्यानंतर दोघांमध्ये कायमची दुष्मनी झाली आणि याच दुष्मनीतून एका पार्टीत नरेंद्रने प्रशांतची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी नरेंद्रला अटक केली आहे.

कोल्हापुर पासून निर्सग रम्य पर्यटन ठिकाण म्हणून आंबा घाट प्रसिध्द आहे. या आंबा घाटात अनेकजण पर्यटण करण्यासाठी तसेच पार्टीसाठी येत असतात. कोल्हापुरातील अनेक तरूण तर आठवडयातून एकदा तेथे पार्टी करण्यासाठी जात असतात. प्रशांत कुंभार आणि नरेंद्र साळोखे हे दोघेजण तसे मित्रच. दोघे ही अश्रून मधून दारू पिण्यासाठी जेवणाच्या पार्टीसाठी ...पान ६ वर

## जन्मदातीच इतकी हैवान का झाली तीन मुलांना मारून आत्महत्या केली



भिवंडी/क्राईम रिपोर्टर

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी असे म्हटले जाते ते काही चुकीचे नाही. कारण आई या दोन अक्षरी शब्दात अवघे भावविश्व समावलेले आहे. कितीजारी संकटे आली तरी आई आपल्या मायेच्या पंखा खाली मुलांना सुरक्षित ठेवते. मुलांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपते. त्यामुळे साक्षात वात्सल्याची करुणामय मूर्ती असलेली एक आई आपल्या तीन मुलांची हत्या करते यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही. पण भिवंडीत सही भयंकर घटना घडली आहे. एका महिलेने आपल्या तीन मुलांना मारून आत्महत्या केली. तिने एवढे टोकाचे पाऊल का उचलले याचा आता पोलीस तपास करीत आहेत.

भिवंडी शहरातील फेणे गाव या ठिकाणी हृदय द्रावक घटना घडली असून पती रात्रपाळी साठी कामावर गेलेला ...पान २ वर

## ज्याच्यासाठी खोदला खड्डा त्यानेच पलटवार केला स्थानिकाच्या हातून परप्रांतीय कामगारांचा जीव गेला

वैभववाडी (सिंधुदुर्ग)/क्राईम रिपोर्टर



मयत सुनील



आरोपी संजय

जो दुसऱ्यासाठी खड्डा खोदतो तोच खड्डा कधी कधी त्याची कबर बनते. वैभववाडी येथील नाधवडे–कुंभजाई गावात असेच घडले. येथील एका कारखान्यात दोन परप्रांतीय आणि एका स्थानिक कामगारामध्ये वाद होता. परप्रांतीय कामगार असलेले मनीषकुमार सिंग आणि आणि धनेश्वर चौधरी आणि स्थानिक कामगार असलेल्या संजय लोखंडे यांच्यात नेहमी भांडणे व्हायची. याच भांडणातून मनीषकुमार आणि धनंजय यांनी संजयला मारण्याचा कट रचला होता. एके रात्री संधी बघून मनीषने संजयला एकट्याला बाहेर गाठले आणि त्याच्यावर चाकू हल्ला करण्याचा प्रयत्न केला, पण संजयने आपला बचाव करीत आपल्याकडील चाकूने मनीषची हत्या केली. त्यानंतर त्याच चाकूने घरात झोपलेल्या मनीषवर वार केले. संजयच्या हल्ल्यात दोघेही मारले गेले. या प्रकरणी पोलिसानी संजय लोखंडेला अटक केली आहे.

नाधवडे–कुंभजाई माळानजीक हरेश जनक हे नवीन क्रशर जोडणीचे काम करीत आहेत. तसे त्यांनी या कामी सरकारी परवानगी घेतली असल्याने सध्या या क्रशर जोडणीचे काम जोमात सुरू आहे. या क्रशर जोडणीचे काम नाशिक येथील एपीसी या कंपनीने घेतले असून त्यानी काही कामगार नाशिक येथीलच घेतले आहेत. या ठिकाणी नाशिक जिल्हयातील संजय बाबुराव लोंखडे, अंबड तालुक्यातील धनेश्वर सत्यनारायण चौधरी आणि सातपुर येथील मनीषकुमार मुन्ना सिंग हे तिघेजण नाशिक जिल्हयातील रात्र आणि दिवस काम करीत आहेत. या ठिकाणी हे तिघे ही येथे वेल्डिंग काम करीत आहेत. इतर ही स्थानिक कामगार या ठिकाणी काम करीत आहेत. ...पान ६ वर

04 TO 11 MAY 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 5/3/2025 8:05 PM Page 1



पान १ वरून...

## व्यसनी मुलाचे डोके फिरले...

सुमारास अमृत भानुदास सोन्नर (वय ४५) याने आपल्या आई चोत्राबाई भानुदास सोन्नर (वय अंदाजे ७२) यांचा दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणावरून वाद घालून दगडाने ठेचून खून केला. अमृतला दारूचे व्यसन होते आणि काही दिवसांपूर्वी पत्नी व मुले त्याच्या त्रासाला कंटाळून माहेरी गेली होती. त्या रात्री आई व मुलगा दोघेच घरी असताना, अमृतने आईकडे पैसे मागितले. पैसे न दिल्याने त्याने रागाच्या भरात आईच्या अंगावर दगडांनी प्रहार केला. जबर मारहाणीमुळे रक्तस्त्राव होऊन वृद्धेचा जागीच मृत्यू झाला. अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी अमृतला अटक केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण गाव हादरले असून आरोपीला फासावर लटकवा अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

## चौथ्या मुलीचे जीवन अल्पजीवी...

शिक्षण नववीपर्यंत झाले असून तिचे सासर पश्चिम बंगाल येथील तर माहेर उत्तर प्रदेश येथील आहे. परंतु अनेक वर्षांपासून तिचे आई-वडिल डहाणू शहरातील लोणीपाडा येथे राहत असल्याने ती येथे प्रसुती साठी आली होती. या प्रकरणी उपविभागीय पोलिस अधिकारी (परीक्षा विधी) भागीरथी पवार या प्रकरणाबाबत अधिक तपास करीत आहेत. पूर्वी अनेक रुग्णालयांमध्ये तिसऱ्या ते पाचव्या महिन्यात गर्भवती महिलेच्या पोटातील बाळाची लिंग तपासणी करण्यात येत असे. याकरिता अनेक रुग्णालयांमध्ये अतिरिक्त शुल्क देखील आकारले जात असे. मात्र शासनाने यावर कडेकोट बंदी आणल्यामुळे असे प्रकार आता घडत नसल्याचे दिसून येत आहे. तरीही काही रुग्णालयांमध्ये छुप्या पद्धतीने असे प्रकार घडत असतात. लिंग तपासणी थांबल्यामुळे भ्रूण हत्या नाहीत.

मात्र अशावेळी बाळ जन्म झाल्यानंतर मुलगी अपत्य झाल्यास हत्या करण्याच्या घटना अजूनही घडतच आहेत. पालघर जिल्ह्यात अनेक वेळा जन्मलेल्या काही तासाच्या व काही दिवसाच्या मुलगी असलेल्या अर्भकाला पाण्यात, कचऱ्यात किंवा झाडाझुडपांमध्ये जंगलात सोडून देण्याच्या घटना घडलेले आहेत. नवजात बाळाला मारून टाकण्याची घटना डहाणू पोलीस स्टेशन हद्दीत अद्याप घडली नसून मागील दोन तीन वर्षात तीन मुली अर्भकाला झाडाझुडपांमध्ये व पाण्यात फेकून देण्याच्या घटना डहाणू पोलीस स्टेशन हद्दीत घडलेले आहेत.

## जमिनीचा वाद अखेर विकोपाला ...

सरकत होती. परिवारातील सदस्यांची संख्या वाढत होती. काळानुरुप प्रत्येकाला आपल्या अधिकाराची जाणीव होण्यास सुरुवात होते. त्याला चव्हाण परिवारातील नव्या पिढीचा देखील अपवाद नव्हता. स्व. रामसिंग चव्हाण यांची मुले सुनिल, अनिल, गोविंदा व संजय हे जगन चव्हाण यांच्याकडे शेतजमीनीच्या वाटणीवरुन वाद घालत होते. गेल्या महिन्यात हा वाद जणूकाही विकोपाला गेला होता. रामसिंग चव्हाण यांचा मुलगा सुनिल याने या वादात पुढाकार घेतला होता. पुढाकार घेत सुनिल रामसिंग चव्हाण याने त्याचे काका जगन चव्हाण यांच्याशी मोठ्या प्रमाणात वाद घालण्यास सुरुवात केली होती. सुनिल हा त्याचे काका जगन चव्हाण आणि काकु कौशल्याबाई यांना धमकावत होता. आपल्या आई-वडिलांना आपला चुलत भाऊ सुनिल धमकावत असल्याचे बघून प्रविण यास त्याचा प्रचंड राग आला. त्यामुळे जगन चव्हाण यांचा मुलगा प्रविण याने त्याचा चुलत भाऊ सुनिल याचा काटा काढण्याचे त्याच दिवशी मनाशी निश्चीत केले. त्यादृष्टीने त्याने मनाशी नियोजन सुरु केले. आपल्या मनात अजिबात राग नाही असे दर्शवत प्रविण याने सुनिलला २५ मार्च २०२५ रोजी सायंकाळी शेतात मांसाहारी पार्टी करण्याच्या बहाण्याने बोलावले. दुपारी तिन वाजता प्रविणचा निरोप मिळाल्यानंतर सुनिलने पार्टीला जाण्याचे नियोजन सुरु केले. पार्टीला येतांना चिकन घेऊन येण्यासाठी प्रविणने सुनिल यास दोनशे रुपये दिले. पोळ्या आणि दारुची व्यवस्था प्रविणने केली. अशा प्रकारे सुनिलला पार्टीच्या बहाण्याने बोलावून त्याला जीवानिशी संपवण्याचे प्रविणचे छुपे नियोजने सुरु होते. ठरल्यानुसार रात्रीच्या वेळी महालखेडा शिवारातील शेतात दोघांनी मद्यसेवनासह मांसाहारी जेवणाची पार्टी सुरु केली. प्रविण याने सुनिल यास मुद्दाम जास्त दारु पाजण्यास सुरुवात केली. वेळोवेळी तो सुनिल यास पेगवर पेग पिण्यास भाग पाडत होता. कसेबसे जेवण आटोपल्यानंतर जवळच असलेल्या विहीरीच्या कडेवर सुनिल पाणी पिण्यासाठी गेला. खाली बसून सुनिल ओंजळीने पाणी पित असल्याची संधी साधत प्रविण त्याच्या मागच्या बाजुने गेला. पाठमो-या अवस्थेतील सुनिलच्या डोक्यात प्रविणने भलामोठा दगड आपटला. मनात साचलेल्या रागातून प्रविणने सुनिलच्या डोक्यावर एका पाठोपाठ दगडाचे दोन ते तिन घाव घातले. मद्याच्या नशेतील सुनिल अचानक दगडाने डोक्यात झालेल्या हल्लयाने विव्हळला. मद्याच्या नशेमुळे त्याची प्रतिकार शक्ती अगोदरच कमी झाली होती. त्यातच हा जीवघेणा हल्ला त्याच्यावर झाला. सुनिलच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरु झाल्यानंतर तो जागेवरच कोसळला. काही क्षणातच तो मरण पावला. सुनिल मरण पावल्याचे लक्षात आल्यानंतर प्रविण मनातून घाबरला. सुनिलच्या डोक्यात मारलेला रक्ताने माखलेला दगड आणि रक्ताने माखलेली माती त्याने विहीरीत टाकून दिली. सुनिलच्या डोक्यातून निघत असलेले रक्त बघून प्रविणने त्याचा मृतदेह पालथा केला. आता सुनिलच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची त्यासाठी त्याने पुढील नियोजन सुरु केले. सुनिलच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याकामी मदतीसाठी प्रविणने त्याचा परिचीत असलेल्या बाळू ममराज जाधव यास फोन करुन टाकळी फाट्यावर बोलावले. प्रविणच्या निरोपानुसार बाळू जाधव हा टाकळी फाट्यावर आला. मात्र दरम्यानच्या कालावधीत प्रविण हा वडगाव महादेव मंदीराजवळ आला.त्यामुळे त्याने बाळूला वडगाव महादेव मंदीराजवळ बोलावून घेतले. वडगाव महादेव मंदीराजवळ बाळूने आणलेली मोटार सायकल उभी करुन प्रविणने बाळूला घटनास्थळी सुनिलच्या मृतदेहाजवळ पायी पायी नेले. घटनास्थळी सुनिलचा मृतदेह बघून बाळू काही क्षण विचारात पडला. त्यावेळी प्रविणने बाळूला सांगितले की मी सुनिलचा शेतजमीनीच्या वादातून दगडाने ठेचून खून केला आहे. ज्या दगडाने मी सुनिलला ठार केले तो रक्ताने माखलेला दगड आणि माती विहीरीत फेकून दिली आहे. सुनिलचा अपघाती मृत्यू झाला असे भासवण्याचे प्रविणनेअगोदरच ठरवले होते. त्यासाठी त्याने ठिकाण देखील बघून ठेवले होते. त्या ठिकाणी मयत सुनिलला त्याच्याच मोटार सायकलच्या सिटवर मध्यभागी बसवून नेण्यात आले. चालकाच्या रुपात पुढे प्रविण, मध्यभागी मयत सुनिलला बसवून शेवटी बसलेल्या बाळूने पकडून ठेवण्याचे काम केले. अशा प्रकारे ट्रिपल सिट आल्यानंतर मयत सुनिलचा मृतदेह त्याठिकाणी खाली उतरवण्यात आला. हा अपघाती मृत्यु आहे असे लोकांना वाटावे यासाठी प्रविणने सुनिलचे डोके दोन ते तिन वेळा जोरजोरात दगडावर आपटले. त्यानंतर त्याची मोटार सायकल त्याच्याच अंगावर टाकून प्रविण आणि बाळू पायी पायी वडगाव शिवारातील महादेव मंदीराजवळ चालत आले. त्याठिकाणी उभी असलेली बाळूची मोटार सायकल प्रविणने ताब्यात घेतली. बाळूलामुक्ताईनगर येथे सोडण्यासाठी प्रविण त्याची मोटार सायकल चालवू लागला. वाटेत कुंड ते जुना मलकापुर दरम्यान पुर्णा नदीच्या बॅक वॉटर पुलावरील रस्त्यावर प्रविण याने रक्ताने माखलेला शर्ट अंगातून काढला. अगोदरच सोबत आणलेला शर्ट त्याने परिधान केला. रक्ताने माखलेले कपडे प्रविण याने एका पिशवीत टाकून ते सोबत घेतले. बाळु जाधव यास मुक्ताईनगर येथे त्याच्या घरी सोडल्यानंतर प्रविण टाकळी येथे जाण्यास निघाला. टाकळी येथे घरी जातांना वाटेत जुन्या कुंड रस्त्याने एक पुलाजवळ रक्ताने माखलेले कपडे प्रविण याने धुतले. त्याठिकाणी धुतलेले कपडे थोडा वेळ वाळवून ते कपडे चिंचखेडा शिवारातील जंगलात त्याने लपवून ठेवले. त्यांनतर जणू काही झालेच नाही अशा अविर्भावात प्रविण आपल्या घरी परत आला. दुसऱ्या दिवशी २६ मार्च २०२५ रोजी सकाळी सुनिलचा अपघाती मृत्यु झाल्याची वार्ता गावात पसरली. माहिती समजताच गावकऱ्यांनी घटनस्थळी धाव घेत हळहळ व्यक्त केली. सकाळी सहावाजताच या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरली. मयत सुनिलचा भाऊ संजय याला देखील याबाबत माहिती समजली. माहिती मिळताच तो देखील त्याचा मुलगा अक्षय याच्यासोबत घटनास्थळी हजर झाला. आपल्या भावाचा मृतदेह बघून संजयला रडू अनावर झाले. या घटनेची माहिती मिळताच मुक्ताईनगर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक नागेश मोहिते आणि त्यांचे सहकारी देखील घटनास्थळी हजर झाले. हा अपघाती मृत्यु नसून ही हत्या असल्याची शंका पोलिस निरीक्षकनागेश मोहिते यांच्या पारखी नजरेने हेरली. मयत सुनिल चव्हाण याचा मृतदेह उत्तरीय तपासणीकामी मुक्ताईनगर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला. आपल्यावर कुणाचा संशय नको म्हणून प्रवीण हा देखील रुग्णालयात साळसुदासारखा हजर होता. तसेच सुनिलच्या अंत्यविधीच्या ठिकाणी प्रविण आणि बाळू असे दोघे हजर होते. उत्तरीय तपासणीनंतर सुनिलवर अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत सुनिलच्या संशयास्पद मृत्युप्रकरणी मुक्ताईनगर पोलिस स्टेशनच्या दप्तरी सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. वैद्यकीय अहवालानुसार सुनिलचा मृत्यु मारहाणीमुळे झाल्याचे निष्पन्न झाले. याशिवाय पोलिस निरीक्षक नागेश मोहिते यांनी घटनेच्या आदल्या दिवसाचा मयत सुनिलचा घटनाक्रम जाणून घेतला. सुनिलला शेवटचे कुणी पाहिले, तो कुणाकुणाला भेटला याची माहिती पोलिस निरीक्षक नागेश मोहिते यांनी जाणून घेतली. पोलिस निरीक्षक नागेश मोहिते यांनी मयत सुनिलचा भाऊ संजय चव्हाण याच्याकडून माहिती घेतली असता घटनेच्या आदल्या दिवशी २५ मे रोजी सायंकाळी सुनिल यास त्याचा चुलत भाउ प्रविण जगन चव्हाण याचा फोन आला होता. प्रविण चव्हाण याने सुनिल चव्हाण यास महालखेडा येथील शेतात मांसाहारी जेवणाची पार्टी करण्यासाठी बोलावले होते. त्यासाठी सुनिल घरातून ताट, पातेले व भाजी तयार करण्यासाठी लागणारे साहित्य घेऊन गेला होता. याबाबत त्याने त्याच्या आईला माहिती दिली होती. त्यानंतर सुनिल घरी परत आलाच नाही व त्याचा मृतदेहच शेताजवळच्या रस्त्यावर मिळून आला. त्याचा मृत्यु झाल्याबाबत त्याच्या सोबत असलेल्या प्रविण चव्हाण व बाळु जाधव यांनी कुणालाच काही सांगितले नाही. त्यामुळे पोलिसांचा दोघांवर संशय बळावला. या घटनेप्रकरणी मयत सुनिलचा भाऊ संजय चव्हाण याने दिलेल्या फिर्यादीनुसार मुक्ताईनगर पोलीस स्टेशनला प्रविण चव्हाण व बाळू ममराज जाधव या दोघा संशयितांविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.न. ९२/२०२५ भारतीय न्याय संहिता १०३(१), २३८ (ए) ३(५) नुसार हा गुन्हा नोंद करण्यात आला. या गुन्ह्यचा पुढील तपास पोलिस निरीक्षक नागेश मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक जयेश पाटील यांच्याकडे देण्यात आला. घटनेच्या आदल्या रात्री संशयीत प्रविण चव्हाण, बाळू ममराज जाधव आणि मयत सुनिल चव्हाण यांचे मोबाईल लोकेशन पोलिस तपासात एकाच ठिकाणी आले. २५ मार्चच्या रात्री आपण महालखेडा शिवारातील शेतात प्रविण सोबत मांसाहारी पार्टी करण्यासाठी जात असल्याचे मयत सुनिल याने त्याच्या आईला सांगितले होते. त्यासाठी तो स्वयंपाकाच्या साहित्याची देखील जमवाजमव करत होता. अंत्यसंस्कार झाल्यानंतर दोघे फरार झाले होते. या सर्व बाबी लक्षात घेत पोलिस निरीक्षक नागेश मोहिते यांचा दोघांवरील संशय बळावला. सहायक पोलिस निरीक्षक जयेश पाटील आणि पोलिस उप निरीक्षक निलेश गोसावी यांच्या अधिपत्याखाली दोन पथके तयार करण्यात आली. मिळालेल्या माहितीच्या आधारे स.पो.नि. जयेश पाटील यांच्या पथकाने प्रविण चव्हाण यास टाकळी गावातून ताब्यात घेण्यात आले. याशिवाय पोलिस उप निरीक्षक निलेश गोसावी यांच्यासह त्यांच्या पथकाने मध्य प्रदेशातील बुरहानपुर येथून संशयीत आरोपीबाळू जाधव याला ताब्यात घेत अटक केली. पोलिस निरीक्षक नागेश मोहिते यांच्यासमक्ष दोघांना हजर करण्यात आले. दोघांची प्रसंगानुरुप कधी एकत्र तर कधी वेगवेगळ्या पद्धतीने खाकीचा खाक्या दाखवत सखोल चौकशी करण्यात आली. पो.नि. नागेश मोहिते यांच्या करड्या आवाजापुढे दोघांचे खोटे बोलणे फार वेळ तग धरु शकले नाही. अखेर दोघांनी आपला कबुल केला. शेतीच्या वादातून मयत सुनिल हा आपल्या आई वडिलांना दम देत होता. त्यामुळे त्याच्या बद्दल आपल्या मनात राग होता असे प्रविण याने कबुल केले. त्यातून त्याने सुनिलला या जगातून संपवण्याचे ठरवले होते. सुनिलला दगडाने ठेचून ठार केल्यानंतर त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याकामी पुढील घटनाक्रमात बाळू जाधव याने त्याला मदत केली. दोघांना अटक करण्यात आली. दरम्यान प्रविण याने पोलिसांना दिलेल्या माहितीत बाळू जाधव याचा भाऊ पिंटू जाधव याचे नाव पुढे आले. प्रविण आणि पिंटू यांच्यात घटनेच्या रात्री घटनेविषयी वारंवार मोबाईल संभाषण झाले होते. प्रविण याने घटनेची सर्व माहिती पिंटूला वेळोवेळी दिली होती. पिंटूला घटनेची सर्व माहिती होती. तरी देखील पिंटूने संशयीतास आश्रय दिला आणि याबाबत पोलिसांना माहिती दिली नाही. त्यामुळे पिंटू जाधव याला देखील संशयीत आरोपी करण्यात आले. अशाप्रकारे शेतीच्या वादातून सुनिलची त्याच्याच चुलत भावाकडून दगडाने ठेचून हत्या करण्यात आली. त्यानंतर त्याची हत्या अपघाती मृत्यु असल्याचा बनाव करण्यात आला. मात्र पो.नि. नागेश मोहिते आणि त्यांच्या सहका-यांनी हा गुन्हा उघडकीस आणला. हा अपघाती मृत्यू नसून खून असल्याचे उघडकीस आणण्याकामी पो.नि. नागेश मोहिते आणी त्यांचे सहकारी सहायक पोलिस निरीक्षक जयेश पाटील, पोलिस उप निरीक्षक निलेश गोसावी, पोलिस नाईक हरिष गवळी, प्रदीप इंगळे, पो.कॉ. सागर सावे व अनिल देवरे आदींनी परिश्रम घेतले. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक जयेश पाटील करत आहेत.

## मोटार सायकलवरून पाठलाग केला...

जिल्ह्यात कॉन्स्टेबल भागवत गिरी या कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचाऱ्याबाबतीत तेच घडले. अवैध मद्य वाहतुकीची खबर मिळाल्याने हेडकॉन्स्टेबल आंधळे यांच्यासह गिरी कारवाईसाठी बाहेर पडले. अवैध मद्य वाहतूक करणारा पोलिसांना पाहून सुसाट वेगाने वाहन पळवू लागला, तेंव्हा पोलीस पाठलाग करू लागले. मग त्या गुंडाने पोलिसांच्या मोटरसायकलला जोराने लाथ मारल्यामुळे मोटरसायकलचा अपघात होऊन कॉन्स्टेबल गिरी यांचा जागीच मृत्यू झाला तर हेड कॉन्स्टेबल आंधळे जखमी झाले. रविवार दि. २३ मार्च २०२५ रोजी दुपारचे साडेबारा वाजले असावेत. अंढेरा पोलीस स्टेशनमध्ये शेलगाव आटोळ बीटचे पोलीस हेडकॉन्स्टेबल रामेश्वर आंधळे आपल्या कामात व्यस्त होते. अचानक त्यांचा मोबाईल वाजला. त्यांनी मोबाईल रिसीव्ह करताच पलिकडच्या व्यक्तीने सांगितले की, सिनगांव जहांगीर येथील संजय उत्तम शिवनकार दुचाकीवर अवैध दारूचे बॉक्स घेऊन विक्री करत आहे. काही वेळात तो देऊळगाव घुबे येथून शेलगाव आटोळच्या दिशेने जाणार आहे. ही माहिती गोपनीय खबऱ्याकडून मिळाली होती. बिटमध्ये दारू विक्रीस उधाण आले होते. त्यावर अंकुश लावण्यासाठी मोठ्या प्रमाणात कार्यवाही सुरू होत्या, संजयवर अवैध दारूचे बरेच गुन्हे दाखल होते, मात्र दारूचा धंदा बंद करण्याऐवजी तो अधिक सराईत झाला होता. त्याला आज रंगेहाथ पकडून कारवाई करू असा निश्चय करून मिळालेली माहिती आंधळे यांनी त्यांचे बिट सहकारी पोलीस कॉन्स्टेबल भागवत गिरी यांना सांगितली. रात्रपाळीवर आलेले गिरी त्यावेळी घरी जाण्याच्या तयारीत होते. रात्रभर कर्तव्यावर असतांनाही वरीष्ठांना कधीच नकार न देणारे आणि सदैव कार्यतत्पर असलेले गिरी यांनी त्वरित या मोहिमेवर जाण्यास कुठलेही आढेवेढे न घेता पोलीस हेडकॉन्स्टेबल आंधळे यांना होकार दिला. अधिक वेळ न घालवता एम. एच. २८ ए. वाय. १६०९ या आंधळेच्या युनिकॉर्न दुचाकीने मोहिमेसाठी सज्ज झाले. दुचाकीने ते दोघेही निघाले. गिरी दुचाकी चालवत होते तर मागे पोलीस हेडकॉन्स्टेबल आंधळे बसले होते. पोलीस स्टेशनपासून तीन किलोमीटरचा प्रवास केल्यावर देऊळगाव घुबे रस्त्यावर शेलगाव आटोळच्या दिशेने दुचाकी त्यांनी उभी केली. दारूचे बॉक्स दुचाकीवर घेऊन येणाऱ्या संजय शिवणकरची ते वाट पहात होते. दहा मिनिटात म्हणजे दुपारी १ वाजण्याच्या सुमारास संजय यामाहा गाडीवरून देऊळगाव घुबेकडून दारूचे बॉक्स घेऊन येतांना त्यांना दिसला. हात दाखवल्यावर तो थांबणार नाही याची अगोदरच कल्पना असावी म्हणून पोलीस कॉन्स्टेबल भागवत गिरी यांनी त्याला दुरून पहाताच दुचाकी सुरू केली. मागे पोलीस हेडकॉन्स्टेबल आंधळे बसले होते, अपेक्षेप्रमाणे संजयला गाडी थांबवण्याचा इशारा करूनही त्याने गाडी थांबवली नाही. पोलीस पाहून उलट त्याने आपल्या दुचाकीचा वेग अधिकच वाढवल्यामुळे गिरी यांनी संजयच्या मागे दुचाकी घेतली. त्याच्या दुचाकीबरोबरच रस्त्यावर समांतर आल्यावर आंधळे यांनी, 'संजय तू थांब, आम्हाला माहित आहे. तुझ्याकडे दारूचे बॉक्स आहेत,' असे सांगितले, मात्र त्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देता संजय सराईतपणे आपल्याच तोऱ्यात दुचाकी पळवत होता. पोलीस कॉन्स्टेबल भागवत गिरी उजव्या बाजूने ओव्हरटेक करून त्याला थांबवण्याचा प्रयत्न करत होते. दोन्ही दुचाकी भरधाव होत्या. कडक उन्हात चोर-पोलिसांच्या पाठलागाचा हा प्रसंग एखाद्या चित्रपटात शोभावा असाच होता. मागावर असलेले पोलीस आपला पिच्छा सोडत नसल्याचे लक्षात आल्यावर, संजय शिवणकर चांगलाच चवताळला, त्याचा राग अनावर झाला. दोघांनाही आता धडा शिकवलाच पाहिजे असा विचार करून, रस्त्याने दुचाकी पळवत क्रूर संजयने उजव्या पायाने पोलिसांच्या भरधाव दुचाकीस इंजिनजवळ चित्रपटातील खलनायकाप्रमाणे जोराने लाथ मारली. अचानक झालेल्या या प्रकाराने भरधाव दुचाकीसह पोलीस कॉन्स्टेबल गिरी आणि पोलीस हेडकॉन्स्टेबल आंधळे रस्त्याच्या उजव्या बाजूने जाऊन पडले. गाडी वेगात एका झाडावर धडकल्याने गिरी यांच्या डोक्यास मार लागला. ते गंभीर जखमी होऊन काटेरी झुडुपात दुचाकीसह पडले. रक्ताच्या धारा वहात होत्या. धडक जोरदार बसल्याने पोलीस कॉन्स्टेबल गिरी रक्ताच्या थारोळ्यात घटनास्थळीच गतप्राण झाले. आंधळे यांच्या उजव्या पायास गंभीर जखम झाली होती. पोलिसांच्या दुचाकीला लाथ मारून संजय शिवणकर शेलगाव आटोळकडे भरधाव निघून गेला होता. अंगाचा थरकाप उडवणारा हा जीवघेणा थरार काही वाटसरू व वाहनधारकांनी उघड्या डोळ्यांनी पाहिला होता. गंभीर जखमी आंधळे यांनी आपल्यावर गुदरलेला प्रसंग वरीष्ठांना सांगितला. कोणतीही हालचाल करत नसलेल्या पोलीस कॉन्स्टेबल गिरी यांचा मृत्यू झाल्याचे नागरिकांच्या लक्षात आले होते. गंभीर जखमी पोलीस हेडकॉन्स्टेबल आंधळे यांना स्थानिक नागरिक मिसाळ व भुतेकर यांनी चार चाकीमधून चिखली येथील खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. खबर मिळताच काही क्षणात घटनास्थळी पोलिसांचा फौजफाटा दाखल झाला. घटनास्थळ पंचनामा व इतर कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून भागवत गिरी यांचा मृतदेह चिखली येथील रूग्णालयात हलवण्यात आला. एका अवैध दारू विक्रेत्याने पोलिसाचा खून केल्याची खबर वाऱ्यासारखी पसरल्याने एकच खळबळ निर्माण झाली. या प्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल रामेश्वर अच्युतराव आंधळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी संजय उत्तम शिवणकर (वय ४५ रा. सिनगाव जहांगीर) याच्यावर अप. क्र. ८७/२५ कलम १०३ (१),१०९(१), २८१,६५ (ए), ६५ (ई) भारतीय न्यायसंहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी काही वेळात आरोपी संजय शिवणकर यास ताब्यात घेतले. शवविच्छेदन झाल्यावर पोलीस कॉन्स्टेबल भागवत गिरी यांच्या मूळ गावी तालुका सिंदखेड (राजा) येथे मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मृतक गिरी यांची पत्नी, चिमुकली मुले, म्हातारे आई-वडील यांचा काळीज चिरणारा आक्रोश उपस्थितांची मने हेलावत होता. डोळ्यांच्या कडा ओल्या करत होता. संशयित आरोपी संजय शिवणकर यास न्यायालयासमोर उभे केले असता, त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. न्यायदेवता आरोपीस काय सजा देईल ते देणाऱ्या काळात समजेल, मात्र अवैध व्यवसाय करण्यास निर्दावलेल्या मुजोर दारू विक्रेत्याने खाकी वर्दीतील तरूण, कामात हुशार असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचा बळी घेतला आहे. चिमुकल्या लेकरांचे पितृछत्र हिरावले आहे. त्या कुटुंबावर कधीच भरून न निघणारा आघात केला आहे. सन २०१४ मध्ये पोलीस खात्यात भरती झालेले भागवत गिरी अंढेरा पोलीस स्टेशनला कार्यरत होते. सदैव कार्यतत्पर नागरिकांच्या मदतीसाठी ते हजर असायचे, वाहतूक असो वा गोपनीय विभाग वरीष्ठांनी सांगितलेले काम त्यांनी चोख केले होते. अवैध व्यावसायिकांवर चार-पाच गुन्हे दाखल झाल्यास पुढील गुन्ह्यात त्यांना जामीनच मिळू नये म्हणजेच अवैध व्यावसायिकांना आपसुकच लगाम लागेल अशा जळजळीत प्रतिक्रिया समाजात उमटत आहेत. या घटनेचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी मनिषा कदम, पोलीस कॉन्स्टेबल अभिजीत ठाकरे करत आहेत.

## कर्जाच्या वसुलीने अंजनाचा घात...

पती अजित दड्डीकर हे ॲटो रिक्षा चालवित असल्याने त्यावरच त्यांचा उदरनिर्वाहा होत होता. संसार करताना प्रत्येकांना कधी तरी कुठे तरी पैशाची ही अडचण येतच असते तशी अडचण लक्ष्मण यांना अनेकवेळा आलेली होती. त्या प्रत्येक अडचणीतून नवरा बायकोनी मिळुन मार्ग काढलेला होता. कोणाचे काही देणे घेणे असेल तर त्या लगेच करीत होत्या. त्याच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच होती त्यामुळे मुलीचे लग्न करताना त्यांनी थोडी फार उसणवारी शेजाऱ्याकडून केलेली होती. तरी ही नवरा बायको चार पैसे राखून होते. त्या पैशातूनच अंजना यांनी आपल्याला दाग दागिणे केलेले होते. सोमवार दि.२१ एप्रिल रोजी रात्री ८ वाजणेच्या सुमारास त्या त्याच्या घरी मृतावस्थेत आढळून आल्या.अजित दड्डीकर हे घरी आल्यानंतर त्यांना त्याची पत्नी ही घरातील किचनमध्ये पडलेली दिसली.त्याच्या गळ्यातील मंगळसुत्र हातातील अंगठी आणि कानातील रिंग नसल्याने घरात कुणी तरी चोर शिरला असावा आणि त्याच्याशी झालेल्या झटापटीत अंजना याचा मृत्यु झाला असावा अशी शंका व्यक्त करून अजित दड्डीकर यांनी कॅम्प पोलीस स्टेशन गाठून या घटनेची माहिती पोलीसांना देवून खूनाची शक्यता व्यक्त केली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी कायदा व सुव्यवस्था शाखेचे डीसीपी रोहन जगदीश, खडेबाजार पोलीस स्टेशनचे एसीपी शेखराप्पा एच. कॅम्प पोलीस स्टेशनचे पो.निरी. अल्ताफ मुल्ला यांनी भेट देवून या घटनेची पाहणी केली. कॅम्प पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून ही घटना चोरीच्या उद्देशाने झाली असल्याची शक्यता व्यक्त करून तपासाला सुरूवात केली. ही घटना घडून दोन दिवस झाले तरी या घटनेचा कोणता ही सुराग पोलीसांना सापडत नव्हता. पोलीसांनी तांत्रिक तपास करीत तपासाला सुरूवात केली. चोरीच्या उद्देशाने ही घडली असती तर घरातील कोणते ही इतर साहित्य हललेले नव्हते. कपाटातील कपडे इतर वस्तु जशास तशा होत्या. फक्त मयत अंजना याच्या अंगावरील दागिने गायब होते.पोलीसांनी मयत अंजना आणि त्याच्या पतीची माहिती गोपनीय रित्या काढली असता मयत अंजना यांनी सुमारे सहा वर्षापुर्वी आपल्या मुलीच्या लग्नाच्या वेळी शेजारी राहणाऱ्या ज्योती नितीन बांदेकर याच्याकडून व्याजाने १५ हजार रूपये घेतलेले होते.ज्योती बांदेकर आणि अंजना याचेत नेहमी या कारणातून भांडणे होत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. या माहिती वरून पोलीसांनी ज्योती बांदेकर यांना संशयावरून ताब्यात घेतले त्याच्याकडे या घटनेची चौकशी केले असता त्या सुरूवातीला उडवा उडवीचे उत्तरे देत होत्या. महिला पोलीसाकरवी त्यांना पोलीसी खाक्या दाखविला असता त्यांनी घडलेला सगळा घटनाक्रम पोलीसांना सांगितला. ज्योती बांदेकर आणि अंजना दड्डीकर या दोघी ही लक्ष्मीनगर गणेशपुर येथे शेजारी राहयला असल्याने दोघींच्यात उठबस होत होती. त्यातून त्याची ओळख वाढल्यावर अंजना यांनी सन २०१९ साली मुलीच्या लग्नाकरिता ज्योती बांदेकर याच्याकडून व्याजाने १५ हजार रूपये घेतले होते. सुरूवातील अंजना या बांदेकर यांना वेळच्या वेळी व्याज देत होत्या. त्यानंतर कोरोना संकट काळात त्याच्या पतीचा धंदा बसल्याने त्यांनी दोन वर्ष व्याज आणि रक्कम ही परत दिली नाही. त्यामुळे ज्योती बांदेकर यांनी दिलेली रक्कम ही दुप्पट होऊन बसली. तरी ही त्यातून परत अंजना या त्यांना त्या रक्कमेपोटी व्याज देत आल्या. परंतु ज्योती बांदेकर यांनी आता तु मला अजून ४५हजार रूपये देणे लागत आहात म्हणून त्याच्याबरोबर सारख्या भांडण काढत होत्या. त्याची भांडणे वाढल्याने अंजना दड्डीकर यांनी त्यांना कोणतीच रक्कम परत दिली नाही. परिणामी ज्योती बांदेकर या आपल्या मुलीला मुलाला घेऊन अंजना याच्या घरी येवून त्यांना पैशासाठी तगादा लावित त्याच्याबरोबर भांडण काढत होत्या. त्या अंजना यांना तुम्ही पैसे परत दिला नाही तर त्याचे परिणाम गंभीर होतील असे म्हणत होत्या.काही केल्या अंजना या त्यांना पैसे परत करीत नसल्याने ज्योती बांदेकर या त्याचेवर चिडून होत्या. काही ही करून अंजना याच्याकडून पैशाची वसुली करायचीच या उद्देशाने त्या साम दाम दंड वापर करण्याचा विचार करीत होत्या. त्यातच अंजना या काही तरी करून तडजोडीने थोडी फार रक्कम कमी करा असे सांगत होत्या. परंतु ज्योती या त्यांना रक्कम कमी करण्यास तयार नव्हत्या. परिणामी त्याची भांडणे वाढली होती. ज्योती बांदेकर या सारख्या त्याच्या मागे पैशासाठी तगादा लावित होत्या. त्या तशा भांडखोर आणि चिडखोर असल्याने समोरच्या व्यक्तींचे त्या काहीच ऐकत नव्हत्या.सोमवार दि.२१ एप्रिल २०१५ रोजी ज्योती बांदेकर या आपली मुलगी सुहानी या दोघी अंजना याच्या घरी पैसे परत मागण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी त्याचेत या कारणातून शाब्दीक वादावादी सुरू होती. अंजना या त्या दोघीना तुमचे पैसे परत देतो पण काही तरी कमी करा आणि थोडा अवधी दया असे म्हणत होत्या. त्यावेळी चिडलेल्या ज्योती यांनी त्यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत अंजना याचे हात मागून पिरगाळून धरले. तर मुलगी सुहानी हिने अंजना हिचे केस ओढून धरत भवानी आमचे पैसे परत देत नाहीस तुला सोन्याचे दागिने घ्यायला पैसे आहेत म्हणत त्यांना धक्काबुक्की करत मारहाण करायला सुरूवात केली. त्याच दोघीच्या तावडीतून सुटण्याचा अंजना यांनी बराच प्रयत्न केला. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. गेली सहा वर्ष तु आमचे पैसे परत देत नाहीस म्हणत त्या दोघीनी अंजना या मारहाण करीत किचनच्या कट्टयावर ढकलून दिले. त्यासरशी अंजना याच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्या ओरडतच खाली पडल्या. त्या खाली पडल्यावर त्याची हालचाल मंदावली हे बघून ज्योती बांदेकर आणि त्याची मुलगी सुहानी या घाबरल्या. त्यांनी अंजना यांना उठविण्याचा प्रयत्न केला असता त्याची काहीच हालचाल होत नव्हती. बहुदा त्या मयत झाल्या आहेत हे त्या दोघीनी ओळखले. आता काय करायचे म्हणत त्या दोघी तेथून पळून जाण्याचा विचार करू लागल्या.आता हे प्रकरण चांगलेच आपल्या आपल्या अंगावर येणार हे त्यांनी ओळखले.यातून काही तरी मार्ग काढायचा आणि आपल्या अंगावर हे प्रकरण येवू नये म्हणून त्यांनी जाताना मयत अंजना याच्या अंगावरील सोन्याचे मंगळसुत्र, हातातील अंगठी आणि कानातील रिंग काढून घेतले. बांदेकर यांनी लागलीच या घटनेनंतर आपल्या अल्पवयीन मुलग्याला फोन लावून दड्डीकर याच्या घराकडे बोलावून घेतले. तो बाईक घेऊन आल्यावर त्याच्या बाईकवरून त्या दोघी निघून गेल्या. त्यांनी या घटनेची कबुली त्यांनी दिल्याने कॅम्प पोलीसात मयत अंजना दड्डीकर याचे पती अजित दड्डीकर यांनी दिलेल्या फिर्यादवरून अंजना अजित दड्डीकर (वय ५४) रा.गणेशपूर लक्ष्मीनगर बेळगावी याच्या खून प्रकरणी ज्योती नितीन बांदेकर (वय ४६) त्याची मुलगी सुहानी नितीन बांदेकर (वय १९) त्याचा अल्पवयीन मुलगा याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला.पोलीसांनी त्यांना कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने ज्योती बांदेकर आणि त्याची मुलगी सुहानी बांदेकर यांची रवानगी हिंडलगा जेलमध्ये केली.तर अल्पवयीन मुलाची रवानगी बालसुधारगृहात केली. या घटनेचा पुढील तपास कॅम्प पोलीस करीत आहेत. गुन्हेगार कितीही चालाख आणि हुशार असले तरी पोलीस त्याच्या ही पुढे असतात. या घटनेतील ज्योती यांनी अंजना यांना मारून चोरीच्या उद्देशाने कुणी तरी दुसऱ्यानेच त्याची हत्या केल्याचा बनाव केला परंतु त्याचा हा बनाव फार काळ टिकला नाही. पोलीस तपासात त्या दोघीचा बनाव उघड पडला आणि त्या पोलीसांच्या जाळ्यात आडकल्या. व्याजाने पैसे दिले तर ते परत येतीलच असे नाही. कारण हल्ली प्रत्येकांचीच अवस्था ही गरज सरो आणि वैद्य मरो अशी झाली आहे हेच या घटनेवरून दिसून येते.

## मासिक पाळीतील स्वयंपाक प्राणावर ...

होता. तर गायत्री शिवणकाम करत असे. दरम्यान, गुरुवारी दुपारच्या सुमारास गायत्री हिने गळफास घेतल्याची माहिती तिच्या माहेरच्यांना मिळाली त्यानंतर त्यांनी गायत्रीच्या घरी धाव घेतली. मात्र गायत्री हिने जीवन संपवलं नसूत तिची हत्या झाल्याच्या दावा माहेरच्या नातेवाईकांनी केला. याबाबत गायत्री हिचा भाऊ सागर कोळी याने धक्कादायक माहिती दिली. गायत्री हिने मासिक पाळी आली असताना जेवण केलं होतं. मात्र गायत्रीच्या सासूसह इतरांना असं जेवण चालत नव्हतं. त्यावरून कुटुंबामध्ये वाद झाला. हा वाद वाढून अखेर गायत्रीची सासू आणि नणंदेने तिला मारहाण केली. तसेच तिची गळा आवळून हत्या केली. तसेच हत्या केल्यानंतर ही आत्महत्या भासावी यासाठी तिचा मृतदेह गळ्याभोवती साडीचा फास लावून लटकवून ठेवला, असा आरोपही त्याने केला. ही घटना घडल्यानंतर मृत गायत्री हिचा पती, सासू आणि नणंद फरार झाले आहेत. आता दोषींवर गुन्हा दाखल होईपर्यंत हा मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा गायत्री हिच्या नातेवाईकांनी घेतला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

## जन्मदातीच इतकी हैवान का झाली...

असताना घरात असलेल्या पत्नीने आपल्या तीन मुलींसह गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सकाळी पती कामा वरून घरी परतल्यावर उघडकीस आली आहे. फेणे गाव येथील एका चाळीत लालजी बनवारीलाला भारती हा यंत्रमाग कामगार पत्नी पुनिता वय ३२ व मुली नंदिनी वय १२, नेहा वय ०७ व अनु वय ०४ यांसोबत राहत होता.लालजी रात्रपाळीसाठी कामावर गेला होता सकाळी नऊ वाजताच्या सुमारास तो घरी परतला असता घरचा दरवाजा आतून बंद होता.अनेक वेळा दरवाजा वाजवून ही पत्नीने दरवाजा न उघडल्याने पती लालजी याने छोट्या खिडकी तून आत डोकावून पाहिले असता त्याच्या पायाखालची जमीन सरकली.हतबल झालेल्या लालजीने टाहो फोडत दरवाजा उघडला असता आत मध्ये छताच्या लोखंडी अँगल वर गळफास घेऊन आत्महत्या केलेले मृतदेह आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस बीट मार्शल यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर भिवंडी शहर पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलिस अधिकारी महिला अधिकारी यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात रवाना केले आहेत.घटनास्थळी आत्महत्या मी स्वतःच्या मर्जीने करीत असून आत्महत्येस कोणालाही जबाबदार धरू नये असे लिहिलेली चिठ्ठी मिळाली आहे.नक्की महिलेने मुलींसह आत्महत्या का व कोणत्या कारणांमुळे केली हे अजून स्पष्ट नसले तरी पोलिस अनेक बाजूने या आत्महत्येचा तपास करण्यात गुंतले आहेत.

04 TO 11 MAY 2025 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 5/3/2025 8:06 PM Page 1



## भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांना पोलीस महासंचालक पदक



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांना त्यांच्या विशेष सेवकांची दखल घेऊन शासनाने त्यांना पोलिस महासंचालक पदक जाहीर केले आहे. एक मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ठाणे येथील कार्यक्रमात ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या हस्ते त्यांना हा पदक देऊन सन्मानित करण्यात आले आहे. जनार्दन सोनवणे यांनी यापूर्वी मुंबई, नाशिक, लासलगाव, ठाणे, अंबरनाथ येथे उत्कृष्ट काम करून सध्या ते भिवंडी येथे गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या सेवेच्या कार्यकाळात अंमली पदार्थ तस्करी, खुन, मोटरसायकल चोरी सारखे विविध गुन्ह्यांचा कौशल्यपुर्ण शिताफीने तपास करून गुन्हेगारांना गजाआड करून कायदा सुव्यस्था अबाधित ठेवली आहे. त्यांनी केलेल्या या उज्वल कामगिरीची विशेष दखल शासनाने घेतली आहे.

## पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते गोपाळपूर येथे ५ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

**लातूर/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील गोपाळपूर येथील श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर परिसरात राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ५ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. या विकासकामांचे भूमिपूजन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते गुरुवारी झाले. या प्रसंगी औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार, श्री नाथ संस्थानचे गुरूबाबा महाराज औसेकर, गहिनीनाथ महाराज औसेकर, गोरखनाथ महाराज औसेकर, श्रीरंग महाराज औसेकर, लातूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे आणि नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे उपस्थित होते. गोपाळपूर येथील श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर परिसरात सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम,



काँक्रीट रस्त्याची निर्मिती, स्वच्छतागृह बांधकाम, प्रसादालय आणि नाली बांधकाम आदी विकासकामे प्रस्तावित आहेत. समाजाच्या उन्नतीत वारकरी संप्रदायाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. आजच्या काळात या संप्रदायाच्या विचारांचा प्रसार होणे अत्यावश्यक आहे. श्री नाथ संस्थान येथे येणाऱ्या भाविकांची संख्या सातत्याने वाढत असून, त्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने ही विकासकामे हाती घेतली आहेत. या सुविधांच्या निर्मितीसाठी आवश्यकता भासल्यास आणखी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे पालकमंत्री श्री. भोसले यांनी सांगितले. आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले की, गोपाळपूर हे आध्यात्मिक नगरी आहे आणि श्री नाथ संस्थानची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी विविध विभागांमार्फत प्रयत्न करण्यात आले. तत्कालीन ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी या विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. औसा तालुक्यातील विकासकामांच्या भूमिपूजनाचा पहिला कार्यक्रम पालकमंत्र्यांच्या हस्ते गोपाळपूर येथे होत असल्याचा आनंद आहे. वारकरी आमदार म्हणून या तीर्थक्षेत्राच्या विकासात योगदान देता आल्याचे समाधान आहे, असे आमदार अभिमन्यू पवार म्हणाले.

## भिवंडीत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



**भिवंडी/प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा ६६वा स्थापना दिवस महाराष्ट्र दिन सर्वत्र उत्साहात साजरा होत असताना भिवंडी शहरात मुख्य शासकीय कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. यावेळी तहसीलदार अभिजित खोल, महसूल विभागातील अधिकारी कर्मचारी शहरातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर तहसीलदार कार्यालयात स्थानिक आमदार महेश चौघुले यांच्या शुभहस्ते तहसीलदार अभिजित खोल यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. पोलिस उपायुक्त कार्यालय प्रांगणात पोलिस उपायुक्त डॉ मोहन दहीकर यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी सर्व पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलिस अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## जातीय जनगणनेचे श्रेय राहुल गांधी यांचे, भाजपने आनंद साजरा करू नये -दयानंद चोरघे

**भिवंडी/प्रतिनिधी**



काँग्रेस पक्षाने सातत्याने सामाजिक न्यायाची भूमिका घेतली असून सर्व जात समुहाला सामाजिक न्याय मिळाला पाहिजे ही काँग्रेस पक्षाचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची आग्रही भूमिका होती. त्यांनी जातनिहाय जनगणनेची मागणी संसदेत लावून धरली होती त्यांच्या या रेट्या मुळेच मोदी सरकारला जातीय जनगणना करण्याची घोषणा करावी लागली. याचे सर्व श्रेय काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे आहे. भाजपा आता सर्वत्र ढोल वाजवून आनंद साजरा करत आहे ते चुकीचे आहे अशी प्रतिक्रिया काँग्रेस पक्षाचे ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी एका पत्रकार परिषदेत दिली आहे. जातीय जनगणना या मागणीला भाजपाचा सुरवाती पासून विरोध होता पण उशिरा का होईना मोदी सरकारला जाग आली, राहुल गांधीं यांच्या रेट्यामुळे मोदी सरकारला हा निर्णय घ्यावा लागला आहे. राहुल गांधी यांच्या संघर्ष व विचारधारेचा हा विजय आहे असे सांगत सरकारच्या या निर्णयाचे स्वागत दयानंद चोरघे यांनी केले आहे. जातनिहाय जनगणनेमुळे सर्व समाज घटकांना विकासात योग्य ते प्रतिनिधित्व मिळेल. काँग्रेस पक्षाने नेहमीच सामाजिक न्यायाची भूमिका घेतली आहे. राहुल गांधी यांनी यासाठी मोठा संघर्ष केला असून पुन्हा त्यांच्या दूरदृष्टीचा अनुभव देशाला व सरकारला आला आहे. भाजप पक्षाचा ओबीसी आरक्षणाला पूर्णपणे विरोध होता. मात्र काँग्रेस पक्षाने संसदेत व संसदे बाहेरही जातनिहाय जनगणनेचा मुद्दा उचलून धरल्याने केंद्र सरकारला जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घ्यावा लागला. राहुल गांधी यांच्या संघर्षाचा व विचारधारेचा हा विजय आहे.राहुल गांधी यांनी यापूर्वी ही जे मुद्दे मांडले त्याकडे अहंकारी केंद्र सरकारने दुर्लक्ष केले होते. पण कालांतराने का होईना केंद्र सरकारला राहुल गांधी यांची भूमिकाच योग्य होती हे मान्य करणे भाग पडले हेच जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाने सिद्ध झाले आहे, असेही शेवटी दयानंद चोरघे यांनी स्पष्ट केले.

## विरार येथे आईच्या हातून निसटून २१व्या मजल्यावरून खालीपडून चिमुकल्याचा मृत्यू

**विरार/प्रतिनिधी**

७ महिन्याचा बाळाचा २१ व्या मजल्यावरून खाली पडून मृत्यू झाला. बुधवारी दुपारी विरारच्या बोळींज येथील जॉय विले परिसरात ही दुर्घटना घडली. बाळाची आई खिडकी बंद करत असताना तिचा तोल गेला आणि तिच्या खांद्यावरून बाळ खाली पडले. विरार पश्चिमेच्या बोळींज येथे जॉय विले नावाचे निवासी संकुल आहे. या संकुलात पिनॅकल नावाची इमारत आहे. या इमारतीत २१व्या मजल्यावरील २१०४ या सदनिकेत विकी सदाने आणि पूजा सदाने हे दांपत्य राहतात. त्यांना ७ महिन्यांचे बाळ होते. बुधवारी दुपारी सव्वा तीनच्या सुमारास पूजा सदाने या बाळाला खांद्यावर घेऊन खिडकी बंद करण्यासाठी गेल्या. मात्र खिडकीजवळ पाणी पडल्याने त्यांचा पाय घसरला आणि त्यांचा तोल गेला. यामुळे त्यांच्या खांद्यावर असलेले बाळ २१ व्या मजल्यावरून खाली पडले. या दुर्घटनेत बाळाचा जागीच मृत्यू झाला. विशेष म्हणजे सदाने दांपत्याला ७ वर्षांनंतर बाळ झाले होते. मंगळवारी बाळाला ७ महिने पूर्ण झाले होते. बुधवारी विकी सदाने नेहमीप्रमाणे कामाला गेले होते. बाळाला बघण्यासाठी काही नातेवाईक घरात आले होते. इतर नातेवाईक घरात होते. महिला खिडकी बंद करताना तिचा तोल गेला आणि खांद्यावरील बाळ खाली पडले अशी माहिती बोळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश कावळे यांनी दिली. या खिडकीला पूर्ण जाळी नव्हती. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे, असे त्यांनी सांगितले. याप्रकरणी बोळींज पोलीस ठाण्यात अपमृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र शासनाचे १०० दिवस उपक्रमामध्ये पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांचा डंका

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सन २०२४ मध्ये राज्यात नवनियुक्त सरकार स्थापित झाल्यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनात सुधारणा व कार्यशिलता वाढविण्यासाठी १०० दिवसाचा उपक्रम जाहीर केला होता. त्यामध्ये कार्यालयीन सुधारणा यामध्ये प्रलंबित प्रकरणांची निर्गती, स्वच्छता, अभ्यागताना सुविधा वैगेरे ०७ मुद्यावर सुधारणा करण्यासाठी सूचित केले होते. सोबतच सूचीबद्ध उपक्रम दिला होता. या उपक्रमामध्ये सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी तसेच अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला होता. पोलीस अधीक्षक महोदय यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेस भेटी देऊन या उपक्रमात चांगल्या प्रकारे सहभाग घेऊन कार्यालयीन सुधारण्यासाठी मार्गदर्शन केले होते. तसेच आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार व पाठपुरावा केला होता. त्यामधून जिल्ह्यातील पोलीस ठाणेस फर्निचर उपलब्ध करून दिले, तसेच इमारतींना रंगरंगोटी केली. तक्रारदारांसाठी कायमस्वरूपी मोबाईल क्रमांक, प्रलंबित गुन्हे, अर्ज, मुद्देमाल, आरोपी दत्तक योजना तसेच स्मार्ट पोलीस, इत्यादी महत्वाचे विषय हाती घेऊन नियोजित कार्यक्रम आखून दिला. त्यावर देखरेख करून निर्गती करून घेतली आहे. जिल्हयातील उद्योजक यांचेशी संवाद साधला. त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या. विशेष म्हणजे पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये सुधारणा करून कार्यालयाचा कायापालट केला होता. महाराष्ट्र शासनाचे या १०० दिवसाचे केलेल्या कामाचा अहवाल शासनास सादर केला होता. त्याचे मूल्यमापन शासनाचे विशेष समितीने करून त्याचा निकाल जाहीर केला असून त्यामध्ये पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांस क्रमांक मिळला आहे. या विशेष कामाबद्दल सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आहे.

## डॉ.बेंडाळे महिला महाविद्यालयात 'खेळाडू गौरव सोहळा' संपन्न



**जळगाव/प्रतिनिधी**

जळगाव येथील डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय (स्वायत्त) येथे 'खेळाडू गौरव सोहळा' मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.गौरी राणे होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा संचालिका डॉ.अनिता कोल्हे यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी जिमखाना विभागाची गौरवशाली परंपरा मांडली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मुळजी जेठा महाविद्यालय (स्वायत्त्य) जळगाव चे क्रीडा संचालक डॉ.श्रीकृष्ण बेलोरकर व श्री शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेती सॉफ्टबॉल खेळाडू कु.नेहा देशमुख उपस्थित होते. आपल्या आवडीच्या खेळाकडे वळून त्यांनी सरावात सातत्य ठेवणे गरजेचे आहे. तसेच जीवनातील प्रत्येक अपयश पचवण्याची क्षमता ज्यांच्या अंगी असेल तो कधीही स्पर्धेत अपयशी होत नाही.असे मत मांडून क्रीडा क्षेत्रातील करिअरची संधी यावर डॉ.श्रीकृष्ण बेलोरकर यांनी विचार मांडले. त्यानंतर दुसरे अतिथी कु. नेहा देशमुख हिने तिचा जीवनप्रवास वर्णन केला. त्यानंतर महाविद्यालयाच्या खेळाडूंशी हितगुज साधतांना ते म्हणाल्या, कितीही अपयश आले तरी खचू नका, यश मिळेपर्यत थांबू नका, क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळवण्यासाठी अथक परिश्रम आणि मार्गदर्शन आवश्यक असून आलेल्या संधीचे सोने करा असा विचार मांडला.यानंतर वरिष्ठ विभागाची जनरल चॅम्पियनशिप कु. नम्रता सुनील बाविस्कर (प्रथम वर्ष वाणिज्य) हिला देऊन गौरवण्यात आले. तर कनिष्ठ महाविद्यालयाची जनरल चॅम्पियनशिप कु.साक्षी सतीश बाविस्कर (अकरावी विज्ञान) हिने पटकावली. राष्ट्रीय,राज्यस्तर, विद्यापीठ स्तरावर विविध खेळांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील विद्यार्थिनींना मान्यवरांच्या शुभहस्ते मेडल्स सन्मानचिन्ह व रोख पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ.गौरे राणे यांनी खेळाडूंचा फिटनेस, सराव,मानसिकता व शैक्षणिक गुणवत्ता यांविषयी सखोल मार्गदर्शन करून खेळाडूंचे मिळविलेल्या यशाबद्दल कौतुक केले. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो.डॉ.व्ही.जे.पाटील, डॉ. पी.एन.तायडे, सौ.सुनीता पाटील उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीपक पवार यांनी केले, तर आभार प्रा.छाया चिरमाडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय सुरवाडे, पुष्कर पाटील, भावेश तायडे यांचे अनमोल सहकार्य लाभले. या सोहळ्यास महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू-भगिनी, खेळाडू व त्यांचे पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

## भीम बांधावर महिलेचा बुडून मृत्यू; १८ तासांनंतर मृतदेह सापडला

**● या ठिकाणी कोणतीही सुरक्षा व्यवस्था ● जलरक्षक नेमावेत ● चेतावणी फलक लावावेत**



**डहाणू/प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील वाघाडी गावाजवळील प्रसिद्ध भीम बांधावर गुरुवारी एक दुर्दैवी घटना घडली. मीना पऱ्हाड (वय ३९, रा. धानिवरी, डहाणू) या महिला पर्यटकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. तब्बल १८ तासांच्या अथक शोधानंतर शुक्रवारी सकाळी त्यांचा मृतदेह सापडला. ही घटना गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास घडली. पऱ्हाड या आपल्या कुटुंबासह पर्यटनासाठी भीम बांधावर आल्या होत्या. त्यांनी अचानक पाण्यात उडी घेतली, मात्र पाण्याचा खोलीचा आणि प्रवाहाचा अंदाज न आल्यामुळे त्या खोल पाण्यात ओढल्या गेल्या आणि क्षणातच बुडाल्या. घटनेनंतर स्थानिक ग्रामस्थ, पोलीस व पाणबुड्यांच्या मदतीने रात्रभर शोधमोहीम राबवली गेली. अखेर शुक्रवारी सकाळी मृतदेह सापडून तो कासा उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. स्वविच्छेदनानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. भीम बांध हे डहाणूतील एक प्रमुख पर्यटनस्थळ असून दररोज मोठ्या प्रमाणावर पर्यटक येथे भेट देतात. मात्र, या ठिकाणी कोणतीही सुरक्षा व्यवस्था नाही. पाण्याचा प्रवाह तीव्र असून खोलीही ४० ते ५० फूटपर्यंत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. चेतावणी फलक, जलरक्षक, वा सुरक्षारक्षकांची येथे कोणतीही सुविधा नाही. या घटनेपूर्वीही भीम बांधावर अशा प्रकारचे अपघात झाले असून मृत्यूच्या घटना नोंदवल्या गेल्या आहेत. मात्र प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत, हे विशेष. स्थानिक ग्रामस्थ आणि पर्यटकांकडून मागणी करण्यात येत आहे की भीम बांधासारख्या ठिकाणी तात्काळ चेतावणी फलक लावावेत, जलरक्षक नेमावेत आणि सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. निसर्गसंपन्न पर्यटनस्थळांवर नागरिकांनी स्वतःची सुरक्षा जपली पाहिजे. मात्र प्रशासनानेही जबाबदारी घेतली पाहिजे. अन्यथा अशा घटना पुन्हा घडतील, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा जि. ठाणे**

सरकार विद्याप्रसारक मंडळ शाळेसमोर, जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, पीन ४०० ६०५

Email - eemsddkalwa@yahoo.co.in Phone & Fax No. 022-25374770

**ई-निविदा सूचना क्र. ०४ सन २०२५-२६ शुद्धीपत्रक**

कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा-ठाणे यांचेकडील ई-निविदा सूचना क्रमांक ०४ सन २०२५-२६ जा.क्र. ९७५ दिनांक ०९/०४/२०२५ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेली निविदा सूचना प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली आहे.

**जा.क्र. : यांभाविवि/लेशा-२/१०२९/सन २०२५**
कार्यकारी अभियंता यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा-ठाणे यांचे कार्यालय
दिनांक : २९/०४/२०२५

**सही/-**
**(सं.ना. रोकडे)**
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी भांडार व विकास विभाग,**
**कळवा-ठाणे**

**जिमाका/पालघर/जाहि १४/२२७/२०२५ दिनांक : ३०/०४/२०२५**


ऑनलाईनही वाचता येईल.. www.crimesandhya.com

## विरार आगाशी जि.प.शाळेला लायन्स क्लबतर्फे आधुनिक बेंचची भेट

**विरार/प्रतिनिधी**

आगाशी येथील जिल्हा परिषद शाळा ही एकेकाळी नावाजलेली व खूप सुंदर म्हणून प्रसिद्ध होती. आधुनिक काळाच्या ओघात इंग्रजीकडे वाढलेल्या लोकांच्या ओढ्यामुळे या शाळेमध्ये विद्यार्थ्यांची वानवा व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शाळेची दुरवस्था झालेली आहे. शाळेमध्ये शिकवणाऱ्या शिक्षकांना यामुळे अनेक अडचणीचा सामना करावा लागत होता. तसेच मुलांना बसायला बेंच नसल्यामुळे विद्यार्थीही शाळेमध्ये यायला नाराज होते. अशावेळी येथील शिक्षकांनी परिसरातील समाजसेवक सचिन म्हात्रे यांच्याशी संपर्क साधला. सचिन म्हात्रे यांनी समस्या लायन्स क्लबचे माजी डिस्ट्रिक्ट गवर्नर लायन डॉ. प्रशांत पाटील यांच्या कानावर घातली. त्यांनी लगेच येऊन शाळेची पाहणी करून तशी विनंती लायन्स क्लब ऑफ मुंबई एंजलच्या लायन सूरज जैन यांना केली.



त्यांनी त्वरित या शाळेसाठी सुंदर रंगीत बेंचेस व एका टीव्हीचा संच भेट देण्याचे कबूल केले. त्या अनुषंगाने काल बुधवारी झालेल्या कार्यक्रमात त्यांनी या वचनाची पूर्तता केली व विद्यार्थ्यांना बेंचेस, टिव्ही संच तसेच त्यांना खाऊचे वाटप केले. यावेळी मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद खूप काही सांगून जात होता. त्याच बरोबरच शिक्षकांनाही खूप आनंद झाला होता. सदर कार्यक्रमाला लायन डॉ. प्रशांत पाटील, लायन सूरजबेन जैन, लायन निनाबेन शहा, समाजसेवक सचिन म्हात्रे, लायन संगीता जैन आदी उपस्थित होते. शिक्षकांनी सर्वांचे स्वागत करून सर्वांचे आभार मानले. लायन प्रशांत पाटील व लायन सूरज जैन यांनी मार्गदर्शन करून व उपस्थितांचे आभार मानले.

04 TO 11 MAY 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 5/3/2025 8:06 PM Page 1



# लढाई पूर्वीची कूटनीती!

अती घाई माणसाचा जीव घेई! असे म्हटले जाते.त्यामुळे कोणतीही गोष्ट करताना अत्यंत सावधपणे आणि दूरदृष्टी ठेवून केल्यास अपयश येत नाही. लढाईचे सुधा तसेच असते. शत्रूच्या तयारीचा आणि क्षमतेचा आढावा घेतल्यानंतरच, त्याच्यावर अटेक करायचा असतो. मात्र घाईघाईने काही केल्यास तोंडघशी पडण्याची पाळी येते आणि म्हणूनच पहेलगाम हल्ल्यानंतर भारताकडून अत्यंत सावकाशपणे रणनीती आखली जात आहे. पहेलगाम हल्ल्यानंतर संपूर्ण भारतात पाकिस्तान विरुद्ध संतापाची लाट उसळलेली आहे. मात्र या संतापला आवर घालणं आवश्यक आहे. कारण कोणतही निर्णायक पाऊल उचलल्या पूर्वी, सर्व बाजूंचा विचार करावा लागतो. भारत सरकारही तेच करीत आहे. म्हणूनच पहिलगाम दहशतवादी हल्ल्याला एक आठवडा उलटून गेला तरी भारत सरकारकडून लष्करी कारवाई झालेली नाही. त्यामुळे देशात अस्वस्थता पसरली आहे. एवढी मोठी घटना घडवूनही सरकार गप्प बसणार आहे का? पाकिस्तानला अद्दल कधी घडवणार? पाकिस्तानमध्ये घुसून दहशतवाद्यांचा खात्मा कधी करणार? अशा प्रकारचे प्रश्न विचारले जात आहेत. सरकारलाही या सगळ्यांची जाणीव आहे. पण काही गोष्टी अशा असतात ज्याचा फार गांभीर्याने विचार करावा लागतो. कारण आपल्या एका चुकीमुळे, देशाची जगभरात कुठेही बदनामी होणार नाही, त्याचबरोबर जगात भारताची जी शांतता प्रेमी राष्ट्र अशी प्रतिमा निर्माण झालेली आहे, तिला कुठेतरी तडा जाता नाही याची सरकारला काळजी घ्यावी लागते. सर्वात महत्त्वाचा म्हणजे जगभरातून भारताला जो पाठिंबा मिळत आहे, त्यात कुठेही अडथळा येणार नाही या सर्व गोष्टींचं विचार करूनच भारत सरकार पावले उचलत आहे. त्यामुळे सरकारवर जरी टीका होत असली, तरी यात सरकारची काही चूक आहे असं वाटत नाही. भारताने भलेही पाकिस्तानवर अजून पर्यत लष्करी कारवाई केलेली नसली, तरी लष्करी कारवाईबाबत आवश्यक ती तयारी सुरू आहे. तसेच पाकिस्तानची चहुबाजूने कोडी केली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी, चार महत्त्वाचे निर्णय घेतले होते. त्यातील पहिला निर्णय सिंधू जलकरार रद्द करण्याचा! सिंधू जलकरार रद्द केल्याने पाकिस्तानवर जे संकट ओढवले आहे ते भयंकर आहे. कारण उन्हाळ्यात सर्वांनाच पाण्याची जास्त आवश्यकता असते. अशावेळी जर एखाद्या देशाच्या पाण्याचा मुख्य स्रोत बंद झाला, तर त्याची काय अवस्था होते याची प्रचिती आज पाकिस्तानला आलेली आहे. पाकिस्तानची ८० टक्के शेती सिंधू नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे भारताने सिंधू जल करार रद्द केल्यामुळे, पाकिस्तानच्या कृषी व्यवसायावर फार मोठा परिणाम होणार आहे. त्याचबरोबर काही मोठ्या शहरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनणार आहे. त्यामुळे सिंधू जलकरार रद्द करण्याचा भारताचा निर्णय म्हणजे पाकिस्तानवर एक प्रकारचा वॉटर स्ट्राइक आहे असे म्हणावा लागेल. त्याचबरोबर अटारी बॉर्डर बंद केल्यामुळे पाकिस्तानच्या व्यापार उद्योगाला मोठ्या फटका बसलेला आहे. अगोदरच पाकिस्तान आर्थिक दृष्ट्या पूर्णपणे कंगाल झालेला आहे. त्यात आता आता अटरी बॉर्डरवरून जो व्यवसाय होत होता तो ठप्प झाला आहे .पाकिस्तानी नागरिकांचा विसा रद्द केल्यामुळे, काय परिस्थिती निर्माण झाली आहे ते गेल्या तीन चार दिवसात दोन्ही देशातील नागरिकांना बघायला मिळाले. भारतात वेगवेगळ्या व्हिसावर आलेल्या नागरिकांना भारतातून परत पाठवण्यात आले. तर पाकिस्तान कडून ही मोठ्या संख्येने भारतीय नागरिक परतले. परंतु आता मात्र अटारी बॉर्डरवर पाकिस्तानने त्यांच्याच नागरिकांना अडवून ठेवल्याने, पाकिस्तानात जाण्यासाठी मोठ मोठ्या रागा लावलेल्या आहेत. पाकिस्तानी नागरिकांची अटारी बॉर्डरवर अत्यंत हलाखीची स्थिती बनली आहे. अटारी बॉर्डरवर अडकलेले पाकिस्तानी नागरिक पाकिस्तानी सरकारच्या १00पिढ्यांचा उद्धार करीत आहेत. तसेच लष्कर प्रमुख असीम मुनीर याच्या आय मायला लाखोली वाहत आहेत.सर्वात महत्वाचे म्हणजे भारताने प्रत्यक्ष जरी युद्ध सुरू केलेले नसले, तरी युद्ध सदृश्य परिस्थिती निर्माण करून पाकिस्तान मध्ये घबराहट माजवली आहे. परिणामी भारतीय हल्ल्याच्या भीतीने पाकिस्तानी नेत्यांची, लष्कराची, आयएसआयची, आणि सामान्य नागरिकांची ही झोप उडाली आहे. पाकिस्तानात नेहमी शांत झोपणारे नागरी आज रात्रभर जगते रहो म्हणत पहारेदारी करीत आहेत. पाकिस्तानी सैन्याच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. सीमेवर मोठा फौजफाटा आणून ठेवण्यात आला आहे. एकूणच पाकिस्तानने युद्धाच्या भीतीने जमेल तेवढी तयारी सुरू केली आहे. तर दुसरीकडे पाकिस्तानी पंतप्रधान शहाबाज शरीफ, अमेरिकेत जाऊन ट्रम्प समोर नाक रगडत, कसेही करून युद्ध टाळा अशी याचना करीत आहेत. आज भारताला पाकिस्तान विरुद्ध जगभरातून पाठिंबा मिळत आहे. तर पाकिस्तानला कुत्राही दरात उभा करायला तयार नाही. प्रत्यक्ष युद्ध न करताही पाकिस्तानला बॅकफूटवर ढकलण्यात भारताला यश आले. हा भारताच्या कुटनिटीचा विजय आहे. जेव्हा दोन देशांमध्ये तणावाचे वातावरण असते, तेव्हा सुरुवातीला दोन्हीकडून युद्ध टाळण्यासाठी शह-काटशहाचे राजकारण केले जाते .जर प्रश्न चर्चेने सुटत असेल तर रक्तपाताची आवश्यकताच का? ही भावना दोन्हीकडच्या लोकांमध्ये असते .सुरुवातीला भारताची सुद्धा हीच भावना होती. परंतु पाकिस्तान कडून अतिरेकाचा कळस झाला. एकीकडे पाकिस्तानचे नेते सांगतात की आम्ही सुद्धा दहशतवादाचे बळी आहोत, .तर दुसरीकडे दहशतवादी नेत्यांना आश्रय देतात. आज पाकिस्तानमध्ये जेवढी सुरक्षा पाकिस्तानचे राष्ट्रपती असिफ मोहम्मद झरदारी यांना नसेल, जेवढी सुरक्षा पंतप्रधान शहाबाद शरीफ यांना नसेल, तेवढी सुरक्षा हाफिज सईद सारख्या दहशतवादी नेत्याला आहे .यावरून पाकिस्तान दहशतवादाला कशाप्रकारे पोसत आहे हे स्पष्ट होते. आणि हीच बाब भारताने जगभरातील प्रमुख राष्ट्रांच्या नेत्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यामुळेच भारताला जगभरातून पाठिंबा मिळत आहे. अगदी इस्लामी राष्ट्र सुद्धा भारताच्या बाजूने आहेत. अशा स्थितीत पाकिस्तानचा विनाश अटळ आहे. आणि हेच टाळण्यासाठी पाकिस्तानी नेते अमेरिकेसारख्या महासत्तांच्या पायावर लोळण घेत आहेत. पण आता त्याचा काही उपयोग होईल असे वाटत नाही. कारण शह-काटशहाच्या राजकारणात भारताने पाकिस्तानवर कधीच मात केलेली आहे. आणि म्हणूनच भारतीय जनतेनेही संयम राखायला हवा. सगळ्याच गोष्टी बंदुकीच्या गोळीने सुटत नाहीत.किंवा रक्तपताने सुटत नाहीत. आर्य चाणक्याने हेच दाखवून दिले होते. आणि म्हणूनच भारतीय नेते चाणक्य नीतिचा वापर करून पाकिस्तानशी प्रत्यक्ष युद्ध न करता, पाकिस्तानला पराभूत करण्याच्या प्रयत्नात आहेत. तेव्हा युद्ध कधी होणार? पाकिस्तान मध्ये कधी घुसणार? असे प्रश्न विचारून आपली निराशा जाहीर करू नये. कारण ज्या दिवशी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पहेलगाव मध्ये भारतीय पर्यटकांवर हल्ला केला, त्याच दिवशी पाकिस्तानच्या बरबादीची तारीखही ठरलेली आहे. आणि हे वास्तव त्यांच्या खुदालाही ठाऊक आहे. कारण अल्ला नेहमीच सत्याच्या बाजूने असतो. त्यामुळे पाकिस्तानला तो कदापी या संकटातून बाहेर काढणार नाही.पाकिस्तानचा अंत निकट आहे.

## 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा'

### महाराष्ट्र दिनः गौरवशाली इतिहासाचा आणि समृद्ध संस्कृतीचा उत्सव...

**१ मे! केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नव्हे, तर प्रत्येक मराठी माणसाच्या मनात धगधगणारी अस्मितेची ज्योत आहे. हा दिवस आहे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा, एका स्वप्नाच्या साकारण्याचा. महाराष्ट्र दिन म्हणजे आपल्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण, आपल्या समृद्ध संस्कृतीचा उत्सव आणि आपल्या एकतेचा हुंकार! याच भावनेतून साकारलेल्या महाराष्ट्राच्या गौरवगाथेचा हा आलेख...**

महाराष्ट्र दिन, म्हणजेच १ मे! हा केवळ एक शासकीय सुट्टीचा दिवस नाही, तर कोट्यवधी मराठी भाषिकांच्या अस्मितेचा, संघर्षाचा आणि गौरवशाली इतिहासाचा उत्सव आहे. याच दिवशी, १ मे १९६० रोजी, संयुक्त महाराष्ट्राच्या स्वप्नाने मूर्त रूप घेतले आणि मुंबईसह मराठी भाषिक लोकांचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले. या दिवसाच्या स्मरणार्थ आणि महाराष्ट्राच्या समृद्ध वारशाचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. सन १९५६ च्या राज्य पुनर्रचना कायद्यानुसार जेव्हा भाषिक आधारावर राज्यांची निर्मिती झाली, तेव्हा मराठी भाषिक प्रदेश वेगवेगळ्या प्रशासकीय विभागांमध्ये विभागलेला होता. मुंबईमध्ये मराठी, गुजराती, कच्छी आणि कोकणी भाषिक लोक एकत्र राहत होते. मराठी भाषिकांच्या मनात आपल्या स्वतंत्र राज्याची तीव्र इच्छा होती आणि याच भावनेतून 'संयुक्त महाराष्ट्र समिती' चा जन्म झाला. या समितीने मुंबईसह संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाला एकत्र आणण्यासाठी एक मोठी चळवळ उभी केली. या चळवळीत अनेक लोक एकत्र आले. एस.एम. जोशी, आचार्य प्र.के. अत्रे, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, सेनापती बापट आणि प्रबोधनकार ठाकरे यांसारख्या अनेक नेत्यांनी आपल्या वाणी आणि लेखणीतून मराठी जनतेला एकत्र केले. या संघर्षात अनेक कार्यकर्त्यांनी त्याग आणि बलिदान दिले. २१ नोव्हेंबर १९५६ रोजी फ्लोरा फाउंटन येथे झालेल्या गोळीबारात १०६ आंदोलकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. या हुतात्म्यांच्या बलिदानाला आणि मराठी माणसाच्या जिद्दीला अखेर यश आले आणि १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते या नव्या राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. महाराष्ट्र हा केवळ एक भौगोलिक प्रदेश नाही, तर तो एका महान संस्कृतीचा वारसा आहे. या मातीने छत्रपती शिवाजी महाराजांसारखे पराक्रमी योद्धे आणि सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान समाजसुधारकांना जन्म दिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वधर्मसमभावाचे हिंदवी स्वराज्य स्थापन केले, जे आजही आपल्यासाठी प्रेरणास्रोत आहे. तर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत एकनाथांसारख्या संतांनी आपल्या अभंगांनी आणि शिकवणींनी समाजाला प्रेम, भक्ती आणि मानवतेचा मार्ग दाखवला. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात रुजवले आणि स्त्रियांच्या उद्धारासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील दुर्बळ घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार ठरले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात विविधता आणि सौंदर्य यांचा संगम आढळतो. गणेश चतुर्थी, दिवाळी, होळी, ईद, नाताळ यांसारख्या सणांना येथे विशेष महत्त्व आहे. पंढरपूरची वारी लाखो भाविकांची श्रद्धा आणि एकतेचे प्रतीक आहे. लावणी, पोवाडा, तमाशा यांसारख्या लोककला महाराष्ट्राची खास ओळख आहेत, ज्या आजही लोकांचे मनोरंजन करतात आणि सामाजिक संदेश देतात. मराठी साहित्यही खूप समृद्ध आहे. संत ज्ञानेश्र्वरांच्या 'ज्ञानेश्र्वरी' पासून ते वि. वा. शिरवाडकर, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, पु. ल. देशपांडे आणि अनेक समकालीन लेखकांच्या मराठी साहित्याने नेहमीच जीवनातील विविध रंगांना आणि अनुभवांना शब्दबद्ध केले आहे. 'माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा' या कुसुमाग्रजांच्या शब्दांत महाराष्ट्राच्या मातीचा गौरव आणि स्वाभिमान व्यक्त होतो. महाराष्ट्र दिनाच्या दिवशी राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये ध्वजारोहण होते. मुंबईतील शिवाजी पार्क येथे भव्य परेड आयोजित केली जाते, राज्याचे राज्यपाल, पोलीस दल आणि इतर शासकीय कर्मचारी सहभागी तेथे होतात. महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरा दर्शवणारे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम यानिमित्ताने आयोजित केले जातात. हुतात्मा स्मारकावर शहीदांना आदरांजली वाहिली जाते आणि राज्याच्या विकासात योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सत्कार केला जातो. आज महाराष्ट्र साहित्य, कला, शिक्षण, उद्योग, तंत्रज्ञान आणि विज्ञान अशा अनेक क्षेत्रांमध्ये अग्रेसर आहे. आपल्या समृद्ध इतिहासाचा आणि सांस्कृतिक वारसाचा मान राखत, महाराष्ट्र प्रगतीच्या मार्गावर वेगाने पुढे वाटचाल करत आहे. महाराष्ट्र दिन हा केवळ भूतकाळाचे स्मरण करण्याचा दिवस नाही, तर भविष्यातील प्रगतीसाठी प्रेरणा घेण्याचा आणि एकजुटीने काम करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' या गर्जनेने आज प्रत्येक मराठी माणसाचे हृदय अभिमानाने भरून येते आणि या राज्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी सज्ज होण्याची प्रेरणा मिळते.

**- राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील**

## दशकपूर्ती महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची!

राज्यातील नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबध्द पध्दतीने लोकसेवा देता याव्या यासाठी शासनाने 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' लागू केला आहे. यामुळे शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी निश्चित झाली आहे. हा अधिनियम २८ एप्रिल २०१५ रोजी अंमलात आला असून राज्यात हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण होत असून त्यानिमित्त हा विशेष लेख

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा कायदा राज्यातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. या कायद्याची व्याप्ती संपूर्ण राज्यभर आहे. हा अधिनियम संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार पात्र असलेल्या व्यक्ती व लोकसेवा देणारी सार्वजनिक प्राधिकरणे यांना लागू होतो. तसेच, या अधिनियमांतर्गत अधिसूचित केलेल्या सर्व सेवांसाठी हा कायदा लागू आहे. या कायद्याचा मुख्य उद्देश हा पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम आणि वेळेत लोकसेवा पुरवणे आहे. यासोबतच, लोकसेवा देणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे हे देखील या कायद्याचे उद्दिष्ट आहे. एखाद्या व्यक्तीची पात्रता संबंधित कायद्यातील तरतूदीनुसार ठरविली जाते. विशेष म्हणजे, या कायद्यानुसार सार्वजनिक सेवा मिळवण्यासाठी कोणताही पात्र व्यक्ती अर्ज करु शकते. परदेशात राहणारी एखादी व्यक्ती कोणत्याही अधिसूचित सेवेसाठी पात्र असेल, तर तीदेखील या कायद्यानुसार सेवा प्राप्त करू शकते. गेल्या दहा वर्षात १८ कोटींपेक्षा अधिक अर्जदारांनी या अधिनियमानुसार अधिसूचित सेवा मिळविल्या आहेत. आपले सरकार पोर्टल यांसारख्या उपक्रमांनी नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारात सुलभता आणली आहे. सर्व विभागांच्या मिळून एक हजारपेक्षा जास्त सेवा अधिसूचित असून त्यापैकी त्यापैकी ५८३ सेवा आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध आहेत. एकूण १ कोटी पेक्षा अधिक नागरिकांनी आपले सरकार पोर्टलवर रजिस्ट्रेशन केलेले आहे. सेवेचा अधिकार म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या वेळेत लोकसेवा मिळवण्याचा हक्क. सार्वजनिक प्राधिकरणात शासनाचे विभाग, विविध सरकारी संस्था, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणाऱ्या अशासकीय संस्था यांचा समावेश होतो. प्रत्येक सेवेसाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या कायद्याची आणि नियमांची प्रत 'आपले सरकार' पोर्टल किंवा 'आरटीएस महाराष्ट्र' मोबाईल पवरून विनामूल्य डाउनलोड करता येते.

सार्वजनिक प्राधिकरणांची भूमिका : या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अधिसूचित सेवा आणि त्यासंबंधीची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य आहे. यासाठी, राजपत्रात अधिसूचना प्रकाशित करण्यात येते. सार्वजनिक प्राधिकरणाने पुरविलेल्या लोकसेवांची यादी, त्यासाठी लागणारा वेळ, विहित शुल्क, पदनिर्देशित अधिकारी आणि अपील प्राधिकाऱ्यांचे तपशील कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि त्यांच्या वेबसाइटवर किंवा पोर्टलवर दर्शविण्यात येतात. ही माहिती प्रदर्शित केली नाही, तर मुख्य आयुक्त किंवा संबंधित आयुक्त स्वतः दखल घेऊन कारवाई करू शकतात. लोकसेवा मिळवण्यासाठी आवश्यक असणारी विविध प्रमाणपत्रे, कागदपत्रे आणि प्रतिज्ञापत्रे कमी करण्यावर या कायद्यात भर देण्यात आला आहे.

### अर्ज कुठे करावा?

लोकसेवा मिळवण्यासाठी अर्जदारास पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे, प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन किंवा 'आपले सरकार सेवा पोर्टल' वरून ऑनलाईन अर्ज करता येतो. प्रत्येक विशिष्ट सेवेसाठी अर्ज करण्याचा नमुना वेगळा असतो. अर्जाचा नमुना आणि आवश्यक कागदपत्रांची यादी संबंधित कार्यालयात, 'आपले सरकार सेवा केंद्रां'मध्ये आणि संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असते.

ऑनलाईन अर्ज सुविधा: 'आपले सरकार सेवा पोर्टल' (https://aaplesarkar.mahaonline.gov.in) हे विविध विभागांच्या लोकसेवांसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी एक सामान्य व्यासपीठ आहे. जे नागरिक स्वतःहून अर्ज करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी राज्यभरात ३२००० हून अधिक 'आपले सरकार सेवा केंद्रे' (SSK) कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त, 'आरटीएस महाराष्ट्र' नावाचे मोबाईल पदेखील वापरकर्त्यांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे. प्रत्येक ऑनलाईन अर्जाला एक विशिष्ट ओळख क्रमांक (युनिक आयडेंटिफिकेशन नंबर - UIN) मिळतो, ज्यामुळे अर्जाच्या प्रगतीचा मागोवा घेणे सोपे होते. जर एखाद्या पात्र व्यक्तीला विहित वेळेत सेवा मिळाली नाही किंवा तिचा अर्ज फेटाळला गेला, तर ती व्यक्ती प्रथम अपील प्राधिकरणाकडे अपील करू शकते. प्रथम अपील अर्ज सेवा नाकारल्याच्या किंवा विहित कालमर्यादा संपल्याच्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत दाखल करता येतो. मात्र, जर अर्जदाराकडे वेळेत अपील न करण्याचे योग्य कारण असेल, तर प्रथम अपील प्राधिकरण विलंब माफ करून ९० दिवसांत अपील स्वीकारू शकते. अपील सुनावणीची नोटीस अर्जदाराला प्रत्यक्ष, नोंदणीकृत पोस्टाने, ईमेलद्वारे, एसएमएसद्वारे किंवा मोबाईल पद्वारे दिली जाते.

आपले सरकार सेवा केंद्रांबाबत माहिती : 'आपले सरकार सेवा केंद्रे' ही नागरिकांना सार्वजनिक सेवा मिळविण्यासाठी मदत करतात. ही केंद्रे तहसील, ग्रामपंचायती, नगरपालिका, आणि काही खाजगी ठिकाणीही उपलब्ध आहेत. ही केंद्रे आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सर्व विभागांच्या सेवा पुरवतात.

लोकसेवेत कसूर झाल्यास कारवाई : या अधिनियमात लोकसेवा पुरविण्यात किंवा अपिलांवर निर्णय घेण्यात अधिकाऱ्यांकडून कसूर झाल्यास दंडात्मक कारवाईची स्पष्ट तरतूद आहे.

पदनिर्देशित अधिकाऱ्यावरील दंड : जर पदनिर्देशित अधिकाऱ्याने विहित वेळेत योग्य कारणाशिवाय लोकसेवा दिली नाही, तर त्याच्यावर कमीतकमी ५०० ते कमाल ५,००० पर्यत दंड आकारला जाऊ शकतो. प्रथम अपील प्राधिकारी सुनावणीनंतर हा दंड लावू शकतात. वारंवार लोकसेवा देण्यात दिरंगाई झाल्यास किंवा अपील प्राधिकाऱ्याच्या निर्देशांचे पालन न केल्यास, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई देखील केली जाऊ शकते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि शासकीय कामांमध्ये पारदर्शकता आणणारा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी आपली भूमिका योग्य प्रकारे निभावणे आवश्यक आहे. नागरिकांनी देखील आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून या कायद्याचा योग्य वापर केल्यास त्यांना वेळेत आणि पारदर्शकपणे लोकसेवा मिळू शकेल.

**- माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई**

## ग्रामीण भागातील नवतरुणांपर्यंत उद्योजकता विकास पोहचवा

# नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे बना-आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची जाणीव लहान वयातच निर्माण झाली पाहिजे. ग्रामीण भागातील नवतरुणांपर्यंत उद्योजकता विकास पोहचवा. उद्योजकता विकास पोहोचवणे ही काळाची गरज आहे. नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे बना, असे प्रतिपादन कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयाअंतर्गत कार्यरत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED), मुंबई यांच्या वतीने आयोजित विभागीय प्रशिक्षण आयोजक कार्यक्रमाचे उद्घाटन काल, कोकण भवन समिती सभागृह, नवी मुंबई येथे संपन्न झाले. या कार्यक्रमात डॉ. सूर्यवंशी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाला एम.सी.ई.डी. मुंबईचे प्रकल्प अधिकारी प्रदीप सावंत, पालघरचे प्रकल्प अधिकारी धम्मपाल थोरात, ठाणे जिल्ह्याचे बायस प्रकल्प अधिकारी सुबोध सिंग यांच्यासह विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी, विविध जिल्ह्यांतील शासकीय अधिकारी, उद्योजकता क्षेत्रातील तज्ज्ञ, प्रशिक्षक व युवक- युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

५० नवउद्योजक घडवा, सहा महिन्यांत प्रगती कळवा : यावेळी बोलताना डॉ. सूर्यवंशी यांनी प्रशिक्षणार्थींना उद्देशून आवाहन केले की, या प्रशिक्षणातून प्रेरणा घेऊन किमान ५० नवउद्योजक तयार व्हावेत, आणि सहा महिन्यांनी आपल्या प्रगतीची माहिती माझ्यापर्यंत पोहोचवावी. तसेच, कोकण विभागात उद्योग स्थापनेसाठी मोठ्या प्रमाणावर संधी आहेत. मत्स्य व्यवसाय, फळप्रक्रिया, पर्यटन, बायोटेक्नॉलॉजी, आयटी सेवा अशा विविध क्षेत्रांत नवउद्योजकांसाठी अमर्याद संधी उपलब्ध आहेत. योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून युवकांना योग्य दिशा देता येईल, असे ते म्हणाले.




स्त्री शक्तीचा अभिमान - उद्योजकतेतील महिलांचा सहभाग वाढतोय : कार्यक्रमाच्या विशेष अतिथी व कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या सहायक संचालक श्रीमती संजीवनी जाधव यांनी महिलांचा वाढता सहभाग अधोरेखित करताना सांगितले, महिला आज केवळ कुटुंबातील नाही तर उद्योग क्षेत्रातीलही खंबीर निर्णयकर्त्या बनत आहेत. त्यांचा आत्मविश्वास आणि पुढाकार अभिमानास्पद आहे. MCED मुंबईचे अधिकारी दत्तात्रय थावरे यांनी संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती दिली. त्यांनी या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना सांगितले की, युवकांमध्ये उद्योजकता वृत्ती जागवणे, व्यवसाय सुलभ मार्गदर्शन, कर्ज सल्ला, आणि शासकीय योजनांशी संलग्नता निर्माण करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.

संपूर्ण कोकणात उद्योजकतेचा वाव : या उपक्रमाच्या माध्यमातून कोकणातील मुंबई, ठाणे, रायगड, आणि पालघर जिल्ह्यांमध्ये उद्योजकतेसाठी पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे. युवकांना नवीन विचार, नवकल्पना आणि स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी हा प्रशिक्षण उपक्रम प्रेरणादायी ठरणार आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

04 TO 11 MAY 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 5/3/2025 8:07 PM Page 1



# वसई विरार शहर महापालिकेत 'महाराष्ट्र दिन' साजरा



**विरार/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त आज दि.०१ मे, २०२५ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय तसेच सर्व प्रभाग समिती कार्यालयांमध्ये 'महाराष्ट्र दिन' साजरा करण्यात आला. महानगरपालिका मुख्यालयात आयुक्त तथा प्रशासक अनिलकुमार पवार यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांमार्फत राष्ट्रगीत, ध्वजगीत व राज्यगीताचे गायन करण्यात आले तसेच प्रतिज्ञा घेण्यात आली. याप्रसंगी आयुक्तांनी केलेल्या आपल्या भाषणात सर्व नागरिकांना 'महाराष्ट्र दिनाच्या' व 'कामगार दिनाच्या' शुभेच्छा दिल्या. यावेळी महापालिकेच्या काही महत्वाच्या योजनांबद्दल माहिती देताना आयुक्तांनी सांगितले कि, महानगरपालिकेने मलनिःस्सारणाचे नवीन दोन प्रकल्प हाती घेतले असून यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान महाअभियान अंतर्गत नालासोपारा पश्चिम येथे ३४.५ द.ल.ली क्षमतेचा व रु.३२९ कोटीचा प्रकल्प तसेच नवघर-माणिकपूर येथे ४७ द.ल.ली. क्षमतेचा व रु.५०६ कोटीचा प्रकल्पाचा समावेश असून या दोन्ही प्रकल्पांना राज्य स्तरीय तांत्रिक समितीची मान्यता प्राप्त झालेली आहे व शासनाकडून लवकरच या कामांबाबतचा निधी टप्प्याटप्प्याने प्राप्त होणार आहे. त्याचप्रमाणे नालासोपारा पूर्व येथे तृतीय स्तरीय प्रक्रिया केंद्र उभारणीचा रु.६१ कोटीचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे शहरात बांधकाम आणि विध्वंस कचरा (construction and demolition waste) प्रक्रिया केंद्र उभारणे बाबतचा प्रस्तावही शासनाला मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. अशाप्रकारे शासनाच्या भरीव योगदानातून व महापालिकेच्या माध्यमातून जल-मलनिःस्सारण प्रकल्प राबविण्याचे काम सुरु आहे.

त्याचप्रमाणे शहरातील पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने खोलसापाडा-२ धरणाचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून या रु.१३५ कोटीच्या प्रकल्पामधून महानगरपालिकेला २२ द.ल.ली. इतके पाणी उपलब्ध होणार आहे. सध्या ह्या धरणाची उंची वाढविण्याचे काम सुरु आहे. त्याचप्रमाणे खोलसापाडा-१ हा साधारणतः रु.२९० कोटीचा प्रकल्पही शासनाच्या निधीतून हाती घेण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. खोलसापाडा-१ प्रकल्पातून महापालिकेला ४८ द.ल.ली. इतके पाणी उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे येत्या पावसाळ्यात पाणी तुंबून राहू नये यासाठी महापालिकेमार्फत पावसाळीपूर्व कामे हाती घेण्यात आली आहेत. शहरातील मोठे, मध्यम, छोटे अशा एकूण २०५ नाल्यांच्या सफाईचे काम सुरु करण्यात आले असून मे महिनाअखेरपर्यंत नालेसफाईचे काम पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. मागील वर्षी महापालिकेमार्फत एकूण रु.३९३ कोटी मालमत्ता कर वसूल करण्यात आला असून यासाठी आयुक्तांनी सर्व नागरिकांचे आभार मानले. तसेच चालू वर्षीही लवकरात लवकर कराचा भरणा करून महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या ५% सवलतीचा फायदा नागरिकांनी घ्यावा. तसेच मालमत्ता करासोबतच पाणीपट्टी कराचा भरणा लवकरात लवकर करून महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन यावेळी आयुक्तांनी केले. या कार्यक्रमास आयुक्त अनिलकुमार पवार, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, प्रथम महापौर राजीव पाटील, माजी सभापती, माजी नगरसेवक, माजी नगरसेविका, विविध पदाधिकारी, पत्रकार, मान्यवर नागरिक, पोलीस विभागातील कर्मचारी, शाळेचे शिक्षक, विद्यार्थी तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

मिरा- भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील बांधकाम विकासक आणि आर.एम.सी.प्लांट धारक यांच्या सोबत तातडीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत शहरात सुरू असलेल्या विविध विकासकामांमुळे निर्माण होणाऱ्या धूळ प्रदूषणावर नियंत्रण करुन हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मा. उच्च नायालयाने हवेतील गुणवत्ता खालावल्याने सु मोटू जनहित याचिका क्र.३/२०२३ दाखल करुन घेतली आहे. हवेची गुणवत्ता सुधारणेकामी विविध उपाययोजना करणेकरिता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेने वेळोवेळी विकासकाम आणि बांधकाम प्रकल्प यांना निर्देश दिले आहेत. सुरु असलेली विकासकामे आणि प्रकल्पाभोवती किमान २५ फूट उंच टिन किंवा धातूच्या पत्र्यांचे शेड उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. मोठ्या बांधकाम प्रकल्पांपासून निर्माण होणारी धूळ थांबवण्यासाठी ही संरक्षक भिंत अत्यावश्यक आहे. बांधकाम किंवा पाडकाम करत असलेल्या इमारतींना हिरव्या जाळी, तागाच्या कपडयाने किंवा ताडपत्रीने पूर्णतः झाकणे बंधनकारक आहे. यामुळे धूळ हवेत न पसरता परिसरात अडवली जाते. बांधकाम स्थळी नियमित पाणी फवारणी करणे आवश्यक आहे. रेती, सिमेंट, माती, मलबा इत्यादी धूळ निर्माण करणाऱ्या साहित्याची वाहतूक करताना पाण्याची फवारणी आवश्यक आहे. बांधकाम साहित्य वाहून नेणारी वाहने पूर्णतः झाकलेली असावीत. उघडी वाहने हवेतील धूळ पसरवतात, त्यामुळे बंदिस्त वाहनेच वापरण्याचे निर्देश दिले आहेत. साहित्य उतरवल्यानंतर वाहने स्वच्छ धुतली गेली पाहिजेत. तसेच पालिकेच्या प्रभागनिहाय सहाय्यक आयुक्तांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील आरएमसी प्लांट्सची माहिती संकलित करून त्याची पाहणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वारंवार सांगून किंवा निर्देश देऊन सुध्दा कोणत्याही प्रकारे नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित विकासक आणि प्लांट चालकांवर कठोर दंडात्मक कारवाई किंवा गुन्हे दाखल करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

# जिल्हा परिषद पालघर येथे महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण



**पालघर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्त जिल्हा परिषद पालघर येथे आज ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या हस्ते ध्वजारोहण हस्ते करण्यात आले. या वेळी प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इजाज अहमद, शरीफ मसलत, चंद्रशेखर जगताप, अतुल पारसकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रवीण भावसार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सोनाली मातेकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संगीता भागवत तसेच जिल्हा परिषद कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# मेट्रोच्या कामा दरम्यान क्रेनचा भाग कोसळला

**ठाणे/प्रतिनिधी**



घोडबंदर येथील कापूरबावडी भागात मेट्रोच्या कामा दरम्यान क्रेनचा लोखंडी भाग थेट रस्त्यावरून जाणाऱ्या एका मोटारीवर कोसळला. सुदैवाने मोटारीच्या मागील भागावर हा भाग पडल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वारंवार संपर्क साधूनही त्यांच्याकडून प्रतिक्रिया मिळू शकली नाही. घोडबंदर भागात वडाळा-घाटकोपर-कासारवडवली मेट्रो मार्गिकेच्या निर्माणाचे काम सुरू आहे. ठाण्याहून घोडबंदच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या मार्गिकेवरील कापूरबावडी भागात शुक्रवारी सकाळी येथील क्रेनचा भाग अचानक कोसळला. दरम्यान, या मार्गिकेवरून जाणाऱ्या मोटारीवर हा भाग कोसळला. त्यामुळे या मोटारीचे नुकसान झाले. या मोटारीत कुटुंब प्रवास करत होते. मोटारीच्या मागील भागावर क्रेनचा भाग कोसळल्याने मोठी दुर्घटना टळली. घटनेची माहिती वाहतुक पोलिसांना मिळाल्यानंतर तेथे वाहतुक पोलिसांचे अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. यापूर्वीही मेट्रोच्या कामा दरम्यान अशा अनेक घटना घडल्या आहेत. या घटनेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वारंवार संपर्क साधूनही त्यांच्याकडून प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

# सेवानिवृत्तीत जाणाऱ्या आरोग्य सेविकेच्या हस्ते ध्वजारोहण

**डहाणू/प्रतिनिधी**



१ मे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने प्राथमिक आरोग्य केंद्र, सोमटा येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्नाली यादव वलटे यांनी एक स्तुत्य आणि भावनिक निर्णय घेत, आपल्या कार्यालयातील आरोग्य सहायिका स्वाती चुरी यांच्याकडून ध्वज फडकवून घेतला. विशेष म्हणजे, श्रीमती चुरी ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत असून, त्यांच्या तीन दशकेहून अधिक काळाच्या सेवेला हा मान देण्यात आला. हा क्षण उपस्थितांच्या डोळ्यांत पाणी आणणारा ठरला. डॉ. स्वप्नाली यादव वलटे या जिल्हा परिषद पालघरचे वाहन चालक अध्यक्ष यादव वलटे यांच्या कन्या असून, त्यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आरोग्य क्षेत्रातील सहकाऱ्यांमध्ये आदरभावना वृद्धिंगत करणारा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. डॉ. वलटे यांच्या या सामाजिक जाणिवेचे व मानवतावादी दृष्टिकोनाचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे.

# अपंग कल्याणकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली जिल्हाधिकारी डॉ.इंदुराणी जाखड यांची भेट!

**पालघर/प्रतिनिधी**



पालघर जिल्ह्यात दिव्यांग बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी अग्रेसर असलेल्या अर्नाळा येथील अपंग कल्याणकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच पालघर जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांची भेट घेतली. या भेटीत जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांच्या समस्या आणि शासकीय योजना यावर चर्चा झाली. या बैठकीत डॉ. इंदुराणी जाखड यांनी दिव्यांग सक्षमीकरणासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना दिले. अपंग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष शमीम खान म्हणाले की, पालघर जिल्ह्यात हजारो दिव्यांग बांधव आहेत. त्या सर्वांपर्यंत शासकीय योजनांचे लाभ पोहोचवणे ही अपंग कल्याणकारी संस्थेची प्राथमिकता आहे. नुकताच संस्थेने वसई आणि अर्नाळा येथे दिव्यांग सक्षमीकरणाचे कार्यक्रम घेतले होते. या कार्यक्रमाची संपूर्ण जिल्ह्यात व्याप्ती वाढवणार आहोत असे शमीम खान म्हणाले. दिव्यांग बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी तालुका आणि जिल्हा स्तरावर नियोजनबद्ध कार्यक्रमाचा प्रस्ताव यावेळी जिल्हाधिकारी यांना सादर करून त्यावर चर्चा झाली. याबाबत जिल्हाधिकारी यांनी लवकरच बैठक घेऊ असे आश्वासन दिले. यापूर्वी तीन वेळा संस्थेने जिल्हाधिकारी यांना यासंदर्भात प्रस्ताव सादर केला होता. आता प्रत्यक्ष नवीनच पदभार स्विकारलेल्या जिल्हाधिकारी डॉ. जाखड यांना भेटून चर्चा केली. डॉ. जाखड यांच्या सकारात्मक प्रतिसादाबाबत संस्थेच्या सदस्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी अपंग कल्याणकारी संस्थेचे पालघर जिल्हा समन्वयक राजेश निजाई आणि आदिवासी सेवक गंगाधर म्हात्रे उपस्थित होते.

# विरारमध्ये टँकरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**विरार/प्रतिनिधी**



भरधाव टँकरने दिलेल्या धडकेत एका महिलेचा मृत्यू झाला आहे. बुधवारी सकाळी विरार येथे ही घटना घडली. संजना संदीप राणे (३४) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. अपघातानंतर टँकर चालक फरार झाला आहे. संजना राणे ही विरार पूर्वेच्या कोपरी चंदनसार नित्यानंद नगर येथे राहते. बुधवारी सकाळी मुलीचे शैक्षणिक प्रगतीपत्रक आणण्यासाठी शाळेत जाण्यासाठी अजित पारकर यांच्या सोबत मुलीला घेऊन दुचाकीवरून निघाली होती. मात्र विरार पूर्वेच्या बजरंग प्लाझा सोळंकी शाळेच्या समोर भरधाव वेगाने येणाऱ्या टँकरने (एम.एच.४३ यु. ८४३१) दुचाकीला (एम एच ४८ बी.वाय. ३९३२) जोरदार धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात दुचाकीच्या पाठीमागे बसलेल्या संजना यांना गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर टँकर चालक वाहन सोडून पळून गेला आहे. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी टँकर ताब्यात घेतले असून फरार चालकाचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. यापूर्वी सुद्धा वसई विरार मध्ये टँकरच्या बेदरकारपणामुळे अपघाताच्या घटना घडल्या आहे. त्यामुळे पुन्हा एकदा नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# दयानंद शिक्षण संस्थेत महाराष्ट्र दिन साजरा

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने महाराष्ट्र दिनाचा ६५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी राष्ट्रगीता बरोबरच महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासावर प्रकाश टाकणारे महाराष्ट्र गीत सादर झाले. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव मा. रमेश बियाणी, संयुक्त सचिव मा. विशाल लाहोटी, अशोक पाटील, कुणाल कोरे, विशाल अग्रवाल यांच्यासोबतच दयानंद शिक्षण संस्थेच्या सर्व महाविद्यालयातील सन्माननीय प्राचार्य उपस्थित होते.


## ग्रामपंचायत खैरेपाडा

**ता.जि. पालघर, दुरध्वनी क्रमांक : ७५५८७७५१७१**

जावक क्र. : २४७/२०२५ | दिनांक : ०२/०५/२०२५

### निविदा सूचना सन २०२५-२६

ग्रामपंचायत खैरेपाडा योग्य त्या वर्गातील कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता मोहरबंद निविदा दि. १३/०५/२०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय खैरेपाडा, ता.जि. पालघर या ठिकाणी मागविण्यात येणार आहेत. प्राप्त निविदा दिनांक १४/०५/२०२५ उपस्थितांसमोर सकाळी ११.३० वाजता सरपंच, ग्रामपंचायत खैरेपाडा यांच्या दालनात उघडण्यात येतील. कोरी निविदापत्रके ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दि. ०५/०५/२०२५ ते १३/०५/२०२५ सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) उपलब्ध होतील. निविदेसोबत 'ग्रामपंचायत खैरेपाडा' यांचे नावे काढलेला इसारा रकमेचा धनादेश/ कनाकर्ष (Demand Draft)/ रोख रक्कम भरल्याची पावती जोडणे आवश्यक आहे. अटी व शर्ती निविदा प्रतिसोबत उपलब्ध करून देण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये | इसारा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे खैरेपाडा येथील नाल्यातील गाळ काढणे व खोलीकरण करणे. | ९९६९००/- | १००००/- | २ महिने | ५००/- |
| २. | मौजे खैरेपाडा गाव हद्दीतील विविध ठिकाणांच्या गटारातील गाळ काढणे व सफाई करणे. | ६९५१००/- | ७०००/- | २ महिने | ५००/- |
| ३. | मौजे रावतेपाडा खैरा येथील नाल्यातील गाळ काढणे व खोलीकरण करणे. | ६६५६००/- | ६७००/- | २ महिने | ५००/- |
| ४. | महादेव नगर मंदिरा पुढील रस्ता करणे. | ९०६६७०/- | ९१००/- | ३ महिने | ५००/- |
| ५. | कृष्णानगर मैदाना मागील कृष्णाधाम जवळील रस्ता. | ६३०१४६/- | ६३५०/- | ३ महिने | ५००/- |
| ६. | विद्यानगर येथील प्रकाश बिल्डींग ते सह्याद्री बिल्डींग येथील गटारावर स्लॅब टाकणे. | ८४६१४९/- | ८५००/- | ३ महिने | ५००/- |
| ७. | साईश्रद्धा बिल्डींग ते साईकृपा बिल्डींग कडील गटावर स्लॅब टाकणे. | ७१५६६१/- | ७२००/- | ३ महिने | ५००/- |
| ८. | वडारपाडा सुनील शिंदे घराजवळील गटार | २६८६०५/- | २७००/- | ३ महिने | ५००/- |
| ९. | विद्यानगर येथे आवश्यक त्याठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. | ८८७४६९/- | ८९००/- | ३ महिने | ५००/- |
| १०. | महिला सभागृहकडून पाईप गटार लाईन टाकणे. | ४६९९२/- | ५००/- | १ महिने | ५००/- |
| ११. | महिला सभागृह सौरक्षण भिंत बांधणे. | ६४९२९१/- | ६५००/- | ३ महिने | ५००/- |
| १२. | महिलांना विविध कौशल्य विकास प्रशिक्षण देणे यासाठी प्रती कोर्स प्रमाणे दरपत्रक. | - | - | - | - |
| १३. | प्लास्टीक खुर्च्या खरेदी करणे. ३०० नग (कंपनीच्या नावासह दरपत्रक) | - | - | - | - |
| १४. | पाण्याच्या टाक्या सफाई करणे. (२५०००० लि., ५००००० लि., ५०००० लि., १००००० लि., व २००००० लि., एकूण ५ टाक्या) दरपत्रक. | - | - | - | - |

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत खैरेपाडा

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत खैरेपाडा

04 TO 11 MAY 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 5/3/2025 8:08 PM Page 1



## पान १ वरून....

### ज्याच्यासाठी खोदला खड्डा त्यानेच ...

गेल्या १० मार्च पासून येथे काम चालू असल्याने नाशिक येथील कामगार येथेच राहून काम करीत असल्याने त्यांनी कामाच्या ठिकाणी साधी पत्र्याची खोली बांधली आहे. पावसाळ्यापुर्वी त्यांना क्रशर जोडणीचे काम करायचे असल्याने कामाला गती ही बऱ्यापैकी कामगारांनी घेतली होती. या क्रशर वरील सर्व कामागारांना दारू पिण्याचे व्यसन असल्याने दिवसभर काम संपवून रात्री ते स्वतः जेवण करून दारू पिऊन झोपत होते. धनेश्वर आणि मनीषकुमार हे परप्रांतिय असल्याने ते कामासाठी रात्र दिवस झटत होते. या कामाचे कॉन्ट्रक्ट नाशिक येथीलच विजय शंकर जस्वाल यांनी घेतले होते. त्याच्या मार्गदर्शनखाली सर्व कामगार काम करीत असल्याने ते रोज कामाचे नियोजन लावीत होते. सर्वांना काम वाटून देत असताना कुणी कोणते काम करायचे हे ते ठरवित होते. या ठिकाणी काम करीत असताना धनेश्वर चौधरी आणि मनीषकुमार सिंग हे दोघे जस्वाल याच्या मर्जीत बसले होते. जस्वाल यांनी कोणते ही काम सांगितले की,ते लागलीच करीत होते. याच्या उलट मात्र संजय लोंखडे याचे होते. तो कामाच्या ठिकाणी दिवसाही आणि रात्री ही दारू प्यायचा. त्यामुळे त्याच्याकडून जस्वाल याच्या मनाप्रमाणे काम होत नव्हते. त्यामुळे ते संजय लोंखडे याचेवर कायम चिडत होते. त्याला शिव्या घालत होते. त्याला ते कामावरून कमी करतो असे सांगत होते. याचा परिणाम संजय लोंखडे याच्यावर उलटाच होत होता. तो धनेश्वर चौधरी आणि मनीषकुमार सिंग याचेवर चिडत होता. ते दोघेच आपली तक्रार जस्वाल यांच्याकडे करीत असल्याचा त्याचा समज झालेला होता.रात्री जेवणाच्या आधी हे तिघेजण दारू प्यायला बसले की, त्याच्यात या कारणातून भांडणे वाद विवाद होत होता. कधी कधी त्याची भांडणे ही मारामारी पर्यत जात होती. संजय लोखडे त्यांना सांगत होता की आपण इथे सगळेजण पोटासाठी आलो आहोत. सर्वजण मिळून मिसळून काम करीत राहू या मात्र धनेश्वर आणि मनीषकुमार हे दोघे त्याला वगळूनच आपले काम करीत होते. त्यामुळे लोंखडे याला त्याचा राग येत होता. तो रागाच्या भरात त्याच्याशी भांडण करून मारामारी करायला जात होता. त्यामुळे धनेश्वर आणि मनीषकुमार या दोघांनी याची तक्रार जस्वाल याच्याकडे केलेली होती.जस्वाल यांनी त्याची तक्रार ऐकून संजय लोंखडे याला समज देत सांगितले होते की. एक तर तु इथे काम व्यवस्थीत कर,नाही तर तुला इथून कामावरून काढून टाकतो जस्वाल यांनी त्याला तसे सांगितल्याने संजयने याचा राग धनेश्वर आणि मनीषकुमार याच्यावर काढायचा ठरविला. रोज रात्री दारू पिऊन तो त्या दोघांच्याबरोबर भांडण काढून तुम्ही माझी तक्रार का करता मी तुम्हा दोघांना ही आता जिंवत सोडत नाही अशी त्याने धमकीच दिलेली होती. त्यामुळे धनेश्वर चौधरी आणि मनीषकुमार सिंग हे दोघे ही सतर्क झाले होते.त्यांनी लोंखडे याच्याबरोबर जास्त बोलणे ही टाळले होते. धनेश्वर चौधरी याने तर मनीषकुमार सिंग याला सांगितले की, संजय हा आपला गेम करण्या अगोदर आपणच दोघेजण त्याची गेम करूया. त्याला मनीषकुमार सिंग याने ही होकार दिलेला होता. ते दोघे ही संजय याला संपविण्याचा प्लॅन करीत होते. याची कुणकुण संजय लोंखडे याला लागलेली होती.त्या तिघांना ही दारू पिण्याची सवय असल्याने रोज रात्री आपल्या घशाखाली दारू रिचवल्या शिवाय त्यांना झोप येत नव्हती. या दरम्यान मुकादम जस्वाल यांना सांगून संजय लोंखडे याने गावी जाण्यासाठी म्हणून २७ एप्रिल पासून तीन दिवसाची सुट्टी घेतली होती. मात्र आपण सुट्टी घेतल्यानंतर चौधरी आणि सिंग याच्या सांगण्यावरून जस्वाल मुकादम याने आपल्याला कामावरून काढून टाकले तर काय करायचे याच विचाराने तो २७ एप्रिललाच परत कामावर हजर झाला होता. तो गावी गेलाच नाही.तो सारखा चौधरी आणि सिंग याचा विचार करीत त्यांना कसा धडा शिकवायचा हा विचार करीत होता.ते दोघे ही मुकादमकडे आपली सारखी तक्रार करतात त्यांना धडा शिकवलाच पाहिजे या विचाराने तो परत त्याच दिवशी कामावर हजर झाला होता. त्याला त्याचे मन आणि डोके शांत बसू देत नव्हते. तो सारखा त्याचा विचार करीत होता.त्याला काय करू आणि काय नको असे झाले होते. त्यातच त्याला ते दोघे आपल्याला मारून टाकणार आहेत याची ही कुणकुण लागलेली होती. बुधवार दि.३० एप्रिल रोजी अक्षय तृतीया असल्याने सर्व कामगारांनी दुपारीच काम बंद करून सुट्टी घेतली होती. दुपारीच हे तिघेजण वैभववाडी येथे येवून फुल्ल दारू प्यायले होते.संध्याकाळी जाताना त्यांनी दारूच्या बाटल्या ही रात्री साठी पार्सल घेतल्या होत्या. बुधवार रात्री दारू प्यायल्या नंतर मनीषकुमार सिंग आणि संजय लोंखडे याचेत याच कारणातून वादावादी सुरू झाली.त्यात धनेश्वर चौधरी याने मध्यस्थी करून वाद मिटविण्याचे नाटक केले. त्याने खुणनेच मनीषकुमार याला खुणवून संजय लोंखडे याला मार असे सुचविले.त्यावेळी नाटक करीत धनेश्वर चौधरी हा खोलीत झोपायला गेला. तर खोलीपासून २०० मीटर अंतरावर रात्रीच्या अंधारात वाद झाल्यावर संजय लोंखडे हा लघुशंकेसाठी गेला. त्याच्या मागे मागे लघुशंकेसाठी मनीषकुमार सिंग हा ही गेला.दोघे ही लघुशंकेसाठी करीत असताना रागाच्या भरात असणाऱ्या मनीषकुमार सिंग याने आपल्या पॅन्टेच्या खिशातून चाकु काढला. त्याच चाकुने त्याने संजयवर वार करण्याचा प्रयत्न केला. मनीषकुमार हा वार करीत असताना त्याला म्हणाला अब तुम्हारे दिखाता हुं, साले म्हणत वार करीत असताना संजयने त्याचा वार चुकविला. तो वार त्याच्या हातावर बसला. संजय याने लागलीच आपल्याकडील चाकु काढून क्षणाचा ही विलंब न करता मनीषकुमार याच्या पोटावर, छातीवर सपासप वार केले. त्यात तो ओरडत रक्ताच्या थारोळ्यात पडला.त्याला मारून तो सरळ धनेश्वर झोपलेल्या खोलीत घसला. धनेश्वर हा जास्त दारू प्यायला असल्याने त्याला कशाची शुध्द नव्हती. संजय हा सरळ जावून त्याच्या छाताडवार बसला.त्याच्याकडील रक्ताने माखलेला चाकू बघून धनेश्वर हा चळाचळा कापायला लागला. तु अभी जिंदा है.तेरे को मारने के लिए मनीषकुमार सिंग को बोलता असे घाबरत घाबरत म्हटले. संजय लोखंडे हा रागाच्या भरात होता. त्याच्या डोक्यात भुत स्वार झालेले होते. त्याने मागचा पुढचा विचार न करता धनेश्वर चौधरीवर चाकूने वार केले. तो चाकूने वार करीत असताना ओरडल्याने त्याचा आवाज ऐकून बाहेर झोपलेला कामगार खोलीत आला. समोर संजय हा चौधरीच्या छातीवर बसून चाकूने वार करीत असल्याचे दिसले. हे बघून त्याची भितीने गाळण उडाली. तो ओरडतच बाहेर आला. त्याने फोन करून या घटनेची माहिती मुकादम जस्वाल याला दिली. जस्वाल हे ही तेथे तातडीने आले. त्यांनी संजय लोखंडे याला तु का मारले असे विचारले असता तो म्हणाला हे दोघे तुमचे चमचे आहेत माझ्या विषयी तुमच्याकडे तक्रार करीत असल्याने मी सिंग आणि चौधरीला मारून टाकले आहे. या घटनेची माहिती लागलीच जस्वाल यांनी सिंधुदुर्ग पोलीसांना दिली. पोलीस ही या दुहेरी खूनाच्या बातमीने हादरून गेले.त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत या घटनेची पाहणी केली. घटनेच्या ठिकाणी कणकवली पोलीस उपाधिक्षक धनश्याम आढाव यानी भेट देवून घटनेची माहिती घेतली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. घटनास्थळी सहा.पोलीस निरी.सुनिल अवसरमोल, हवा. अभिजीत तावडे, शैलेंद्र कांबळे, संदीप कांबळे, राहुल तळसकर, सुरज पाटील, अजित पडवळ, दिग्विजय काशिद, संदीप राठोड, अजय ब्लिपे यांनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. घटनास्थळीच संशयीत लोखंडे हा बसला होता. तो ही थरथर कापत होता. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी वैभववाडी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिले. संजय लोखंडे याला ताब्यात घेऊन पोलीसांनी त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती जाणवत होती.मात्र त्याने पोलीससमोर आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती दिली. त्याने या घटनेची कबुली दिल्यावर पोलीसांनी या घटनेची फिर्याद मुकादम विजय शंकर जस्वाल रा.नाशिक याचेकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार धनेश्वर सत्यनारायण चौधरी (वय ६६) रा.नाशिक आणि मनीषकुमार मुन्ना सिंग (वय ३५) रा.नाशिक याच्या खुन प्रकरणी संजय बाबुराव लोखंडे (वय ३८) रा.नाशिक यांच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. संजय लोखंडे याला पोलीसांनी सिधुंदुर्ग येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला सहा दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी संजय लोखंडे याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकु आणि रक्ताने माखलेले कपडे जप्त केले. या घटनेचा पुढील तपास सिधुंदुर्ग पोलीस करीत आहेत. क्षणीक राग डोक्यात गेला की, त्यातून मोठा अनर्थ घडतो आणि त्या रागापोटी नको ते करून बसतो हेच या घटनेवरून दिसून येते. ही दुहेरी खूनाची घटना संजय लोखंडे याने त्याने सांगितलेल्या कारणातूनच केली आहे की, त्याला अन्य कोणते कारण आहे याचा तपास पोलीस करीत आहेत.

### नरेंद्र सुडाने भयंकर पेटला...

एकत्र येत होते. हे दोघे ही आपल्या मित्रांच्या ग्रुपमधून गेल्या दोन वर्षापूर्वी आंबा घाटात दारू आणि जेवणाच्या पार्टीसाठी गेले होते. जेवणाची आणि दारूची पार्टी असल्याने मित्राबरोबर त्या दोघांनी ही त्यावेळी भरपुर दारू पिली होती. दारूची नशा जास्त झाल्यावर त्या दोघांत काही तरी बिनसले. दोघे ही एकमेकांना अर्वाच्च भाषेत शिव्या देत एकमेकांच्या अंगावर जात मारामारी केली होती. त्यावेळी दोघांनी ही एकमेकांना बघून घेण्याची भाषा केली असल्याने दोघांच्यात ही त्यावेळेपासून विस्तव जात नव्हता. दोघे ही कधी एकमेकां समोर आले तर दोघे ही एकमेकांना शिव्या देत तुला आता सोडत नाही असे म्हणत होते. नरेंद्र साळोखे हा एका खाजगी फायनान्स कंपनीत काम करीत होता. त्यामुळे त्याच्याकडे कायम पैसे असायचे. तो नेहमी कुठल्या ना कुठल्या बारमध्ये दारू पित बसत असायचा त्यावेळी तो सोबत असणाऱ्या आपल्या मित्रांना प्रशांत कुंभार याचा कायमचा काटा काढयाचा आहे त्याला जरा मस्ती आली आहे. त्याची मस्ती मला जिरावायची आहे हे तो म्हणत होता. त्याचे मित्र ही त्याला झाला विषय सोडून दे की रे कशाला त्या भानगडीत पडतोस, तुला काय कामधंदा आहे की नाही असे म्हणून त्याला गप्प बसवित होते. तरी ही नरेंद्र याच्या डोक्यात प्रशांतची किड वळवळत होती. कधी एकदा त्याला धडा शिकवितो असे त्याला झाले होते. तर इकडे प्रशांत हा गेल्या दोन वर्षापूर्वी नरेंद्र यांच्याबरोबर झालेला वाद विसरून जाण्याचा प्रयत्न करीत होता. आपल्या घरची परिस्तीती ही बेताचीच आहे आपण कमवलो नाही तर आपले कुटूंब कसे जगणार. तसेच आपले लग्न होऊन पाच वर्ष झाली आहेत. आपल्याला चार वर्षांची मुलगी आहे. घरात वयोवृध्द आई वडिल आहेत याचे त्याला भान होते. त्यामुळे तो नरेंद्रबरोबरचा वाद मिटविण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु नरेंद्र हा सणकी असल्याने त्याच्या डोक्यात फक्त एकच प्रशांत याची मस्ती जिरावायची त्याला काही ही करून कायमची अद्दल घडवायची असे त्याच्या मनात घुसमत असायचे. त्याला दारूची झिंग चढली की, त्याच्या डोक्यात प्रशांतचा विषय यायचा. खरे तर त्या दोघात कायम दुश्मनी असणारी सारखी कोणतीच मोठी घटना घडली नव्हती. तरी ही तो प्रशांत याला कायम पाण्यात बघत होता. समोर तो आला की, त्याला घालून पाडून बोलायचा शिव्या दयायचा. त्याने शिव्या दिली की, मग प्रशांत ही प्रति उत्तर म्हणून शिव्या देत होता. त्यामुळे दोघांत समेट घडून येण्याऐवजी कटूता वाढत होती. त्याला ते दोघे तरी काय करणार होता. त्याच्या मित्रांनी त्या दोघातील वाद बऱ्याच वेळेला मिटविण्याचा प्रयत्न केलेला होता. तरी ही तो वाद काही मिटत नव्हता. गेल्या बुधवार दि.२३ एप्रिल २०२५ रोजी शिवाजी पेठेतील मयुरेश विजय शेळके यांने रात्री रंकाळा परिसरातील संध्यामठ कमानीजवळ तटाकडील तालीम मंडळाच्या कार्यकर्त्यासह पणाली हॉल येथे मित्रांना जेवण ठेवलेले होते. त्या जेवणाच्या कार्यक्रमाला प्रशांत कुंभार हा हजर होता. बऱ्याच मित्रांनी जेवणाची पार्टी असल्याने अगोदरच बाहेरून दारू पिऊन आले होते. प्रशांतने थोडीशी दारू आपल्या घशाखाली रिचवली होती. नेमके त्या पार्टीत रात्री उशिरा नरेंद्र साळोखे हा आला. येताना तो फुल्ल दारू पिऊनच तेथे जेवणासाठी आलेला होता. नरेंद्रला दारू जास्त चढली असल्याने त्याला तेथे प्रशांत कुंभार हा दिसला. मागील कुरापत उकरून काढण्याचे नरेंद्र याच्या डोक्यात आले. तो प्रशांत जवळ जात तु इथे पार्टीला का आला आहेस? तुला पार्टीला कुणी बोलाविले.तु येथून न जेवताच जा.नाही तर मी तुला बघून घेईन. त्यावेळी प्रशांत त्याला बाजुला घेऊन जाण्याचा प्रयत्न करू लागला. त्यावर नरेंद्र हा चिडला. त्याने प्रशांतची गळफट धरली. माझी गळफट सोड, ही पार्टी तुझी नाही, मयुरेश शेळके याने मला येथे बोलाविले आहे तु त्याला जावून विचार असे म्हणत प्रशांतने आपली गळफट सोडविली. तर नरेंद्र हा त्याचेवर जास्तच पिसाळला. त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या देत तो त्याच्या घरच्या विषयी काही तरी बरळला. त्यावेळी प्रशांतला त्याचा राग आला. तो ही त्याला शिव्या देऊ लागला. दोघात हाणामारी सुरू झाली. पार्टीत एकप्रकारे राडा आणि हंगामा सुरू झाला. दोघे ही एकमेकावर तुटून पडले. पार्टीतील मित्र दोघांचे भांडणे सोडविण्यासाठी पुढे आले. परंतु दारूच्या नशेत असणाऱ्या नरेंद्रवर भूत स्वार झालेले होते. मित्रांनी त्याला सोडवून बाजुला घेतले तरी ही तो तावातावाने प्रशांत कुंभार याच्या अंगावर जात होता. पार्टीचा बेरंग झाला होता. काही जण ही मारामारी बघून तेथून निघून गेले. पाच सहा राहिले होते. त्यांनी दोघांची भांडणे मिटविण्याचा प्रयत्न केला. खरे तर आज मिळालेल्या संधीचा फायदा नरेंद्रला उठवायचा होता. तो कोणाचे काही ऐकत नव्हता. तो परत परत उठून प्रशांत याला मारायला जात होता. दोघे ही एकमेकांना बघून घेण्याची भाषा करीत होते. त्यातच मित्रांची नजर चुकवून तो प्रशांतजवळ जात त्याने आपल्या खिशातील चाकू काढला आणि प्रशांत याच्या डाव्या बाजूस असणाऱ्या पोटाकडील भागात चाकूने सपसाप वार करीत मर साल्या, मला मारणार होतास ना असे म्हणत चाकू खुपसला. त्यासरशी प्रशांत ओरडत खाली पडला. प्रशांतच्या पोटातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. या घटनेने मित्र ही भांबावून गेले. काय करायचे हे त्यांना पण सुचेना. नरेंद्रच्या हातात रक्ताने माखलेला चाकू होता. मारलो साल्याला. मला मारणार होता ना म्हणत पुढे कुणी यायचे नाही नाही तर मी देखील तुम्हाला बघून घेईन अशी धमकी देवू लागला. त्यामुळे कुणी ही त्याच्यापुढे जाण्याचे धाडस करीत नव्हते. शेवटी तो सगळ्यांना शिव्या देत तेथून निघून गेला. इकडे मित्रांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या प्रशांतला सीपीआर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.परंतु तेथील उपचारापूर्वीच त्याचा मृत्यु झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले.या घटनेची माहिती मयत प्रशांत कुंभार याच्या घरच्या लोकांना देण्यात आली. ते ही तातडीने सीपीआर रुग्णालयात दाखल झाले. तेथे त्याच्या वयोवृध्द आई वडिलांनी आणि पत्नीने हे काय झाले म्हणून मोठयाने अक्रोश केला. तर इकडे या घटनेनंतर नरेंद्र साळोखे हा दारूच्या नशेतच जुना राजवाडा पोलीस ठाण्यात गेला. तेथे असणाऱ्या पोलीसांना त्याने संध्यामठ तालीम मंडळाजवळी पणाली हॉलमध्ये प्रशांत कुंभार आणि त्याच्या मित्रांनी आपल्या जबर मारहाण केल्याचे सांगून तेथे तो धिंगाणा घालत होता. पोलीसांना तो तक्रार दाखल करून घ्या म्हणून सांगत होता. परंतु त्याच्या शर्टावरील रक्ताचे डाग बरेच काही पोलीसांना सांगत होते. पोलीस त्याचे म्हणणे ऐकून घेत असतानाच तेथे मयुरेश शेळके हा आला. त्याने पोलीसांना सांगितले की, नरेंद्रने दारूच्या नशेत प्रशांत याच्या पोटात चाकू खुपसला असून त्यात प्रशांत याचा मृत्यु झाला आहे. त्याला सध्या सीपीआर मध्ये नेले आहे. ही माहिती मिळताच पोलीसांनी नरेंद्र याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून खूनात वापरलेला चाकु काढून घेण्यात आला. पोलीसांनी घटनास्थळी जावून या घटनेची पाहणी करून पंचनामा केला. तसेच मयताचे पोस्टमार्टम सपीआर रुग्णालयात केले. या घटनेची लेखी फिर्याद मयुरेश विजय शेळके (वय ३०) रा.शिवाजी पेठ कोल्हापुर याने जुना राजवाडा पोलीसात दिल्याने पोलीसांनी प्रशांत भीमराव कुंभार (वय ३८) रा.देवकर पाणंद कोल्हापुर याच्या खुन प्रकरणी त्याचा मित्र नरेंद्र राजाराम साळोखे (३४) रा.नाथा गोळे तालीम शेजारी कोल्हापुर याच्या विरोधात भा.दं. वी. कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलीसांनी त्याला कोल्हापुर येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने नरेंद्र साळोखे याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.या घटनेने अनुचीत घटना घडू नये म्हणून जुना राजवाडा पोलीसांनी सीपीआर रुग्णालयात आणि प्रशांत राहत असलेल्या परिसरात व संशयीताच्या घराजवळ तगडा बंदोबस्त ठेवला होता. हल्ली जेवणाच्या दारुच्या पार्टीत मित्रा मित्रातील वाद हा विकोपाला गेला की त्यातून खूनसारखी घटना ही घडतेच. या घटनेतील प्रशांत कुंभार आणि नरेंद्र साळोखे हे दोघे ही मित्रच. परंतु गेल्या दोन वर्षापूर्वी आंबा घाटात झालेल्या पार्टीत त्याचेत वाद झाला. तो वाद त्या दोघांत दोन वर्षापासून धुसमतच होता. अखेर या वादाची परिणीती बुधवार दि.२३ रोजी झालेल्या जेवणाच्या पार्टीत झाली. दारूची नशा अंगात भिनल्यावर शेळीचा पण वाघ बनतो आणि तो समोरच्यावर हल्ला करायला ही मागे पुढे पाहत नाही. तसे बघितले तर दोघातील वाद हा क्षुल्लक होता. पण त्याचा रागाचा परिणाम मात्र खूनाच्या घटनेत झाला. म्हणून रागावर नियंत्रण तर जीवानावर नियंत्रण असेच येथे म्हणावे लागेल.

## पान ८ वरून....

### पालघर जिल्हा पोलीस दल ठरलं ...

जिल्हा पोलीस दलाने प्रथम क्रमांक मिळवला होता. हा ७ कलमी कार्यक्रम हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक विनायक नरळे यांच्या संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेवून यशस्वीरित्या राबविला आहे. राज्यात ७ जानेवारी ते १६ एप्रिल या कालावधीत १०० दिवसांची 'कार्यालयीन सुधारणांची' विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. राज्यातील सर्व मंत्रालयीन विभागांचे अधिकारी कर्मचारी यांच्या कामगिरीचे कार्यालयांची संकेतस्थळे, सुकर जीवनमान, स्वच्छता, तक्रार निवारण, अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी, कृत्रीम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (एआय), नाविन्यपूर्ण उपक्रम इत्यादी निकषांच्या आधारे मूल्यमापन करण्यात आले. या अंतरिम प्रगतीच्या मूल्यमापनामध्ये राज्यातील सर्व पोलीस अधीक्षक कार्यालयांमधून पालघर पोलीस अधीक्षक कार्यालयास राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला होता. २७ फेब्रुवारी रोजी पालघर पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांना मुख्यमंत्री यांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले होते.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अव्वल**

मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने विविध उपक्रम राबविले आहेत. नुकताच त्याचा निकाल जाहीर झाला असून आयुक्तलयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. आयुक्तालयास १०० पैकी ८४.५७ गुण प्राप्त झाले आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये ७ कलमी १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम राबविण्याकरीता निर्देश दिले होते. या सात कलमी कार्यक्रमात कार्यालयातील सोयीसुविधा, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारीचे निवारण, गुंतवणुकीस प्रोत्साहन, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी, संकेतस्थळ आदींचा समावेश आहे. त्याच पार्श्वभूमीवर मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाने या अंतर्गत विविध उपक्रम राबवून कार्यालयीन सोयीसुविधा यासह नागरी तक्रारीचे



निवारण करण्याच्या दृष्टीने उपायोजना आखल्या आहेत. यात आयुक्तलयाचे संकेतस्थळ अद्यावत करण्यात आले आहे. याशिवाय त्याचे (CERTIn) यांचे मार्फतीने सायबर ऑडीट केले आहे. याशिवाय परिमंडळ ०१ मधील सर्व पोलीस ठाणे व कार्यालये यांना आय एस ओ व स्मार्ट प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात आली, जनजागृती विषयी माहिती नागरिकांना मिळावी यासाठी व्हाट्सप चॅनेल, बाल रक्षा अभियान, सायबर गुन्हेगारी बाबत जनजागृती उपक्रम सुरू केले आहेत. याशिवाय स्वच्छतेच्या दृष्टीने पोलीस ठाणे व कार्यालयात मुदतबाह्य अभिलेख, बेवारस व जुनी वाहने यांची कायदेशिर विल्हेवाट लावून कार्यालयांचा परिसर मोकळा व स्वच्छ केलेला असून तिथे फुलझाडे व कुंड्या लावून सुशोभिकरण केले आहे. तर दुसरीकडे कार्यालयीन सेवा सुविधांवर आयुक्तालयाने चांगला भर दिला आहे. नागरीकांसाठी स्वच्छ पिणाच्या पाण्याची सोय, प्रसाधनगृहे, बैठक व्यवस्था, कार्यालयांचे अद्यावत, वर्क फोर्स ॲप, पोलीस ठाण्याला आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे, ७ वर्षावरील शिक्षा असलेल्या सर्व गुन्ह्यांच्या घटनास्थळावरुन फॉरेन्सिक दुवे गोळा करण्यासाठी आय बाईक (तपास वाहने) फॉरेन्सिकच्या ३ टीम स्थापन केल्या आहे.आयुक्तालयातील सर्व कार्यालयांमध्ये ई-ऑफिस कार्यप्रणाली सुरू केली आहे. स्मार्ट ई-बीट हे मोबाईल ॲपलीकेशन सर्व पोलीस ठाण्यांतील बीटमार्शल यांनी एखाद्या ठिकाणी दिलेली भेट व वेळ याबाबत पर्यवेक्षण करण्याकरीता सुरु केले असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. तर आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन देण्यासाठीही उपाययोजना आखण्यात आल्या आहे.

या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचं अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषदेने केले होते.नुकताच शासनाने जाहीर केलेल्या निकालात सर्व पोलीस आयुक्तालयातून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करुन पोलीस आयुक्तालयांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला असून आयुक्तालयाला १०० पैकी ८४.५७ गुण मिळाले आहे. आयुक्तालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे आज नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करता आले असल्याची प्रतिक्रिया पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय यांनी दिली आहे. प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल आनंद तर आहेत पण केलेल्या कामाचे समाधान असल्याचे त्यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धीमत्ता (ए आय) च्या माध्यमाने आयुक्तालयाच्या हद्दीत असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरांचा वापर करुन वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई. तसेच बॉडी वॉन कॅमेरा वाहतूक पोलीसांच्या कार्यक्षमतेत गुणात्मक व पारदर्शी सुधारणा होण्यासाठी वाहतूक अंमलदारांना कर्तव्यावर असताना बॉडी वॉर्न कॅमेरे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. पोलीस ठाण्यांमध्ये येणाऱ्या नागरीकांना त्यांना आलेला अनुभव नोंदविण्याकरीता ई-अभिप्राय सेवा (क्यू आर कोड बेस) सुरु करण्यात आली असून त्यामध्ये नागरीक सुलभरीत्या त्यांचा अभिप्राय नोंदविता येणार आहे व त्यावर वरिष्ठ अधिकारी देखरेख करतात. असे विवीध नावीन्य पूर्ण उपक्रम ही आयुक्तालयाने सुरू केले आहेत.

### जी गोष्ट मानवी मेंदू करू शकतो...

असलेल्या माहितीतून 'एआय' शिकत गेली. 'एआय' बद्दल माणसं दोन टोकाचं बोलतात एक म्हणतात 'एआय'मुळे काहीच होणार नाही. दुसरं टोक म्हणतं 'एआय'मुळे माणूसच नष्ट होईल. 'एआय' सुनामी आहे. सगळ्याच्या जीवनात फरक पडणार आहे. नोकऱ्या कमी होतील. यावर उपाय काय तर 'एआय'चा वापर करून आपली काम अधिक चांगली कशी होतील हे शिकलं पाहिजे. 'एआय'चं वास्तव आकलन करून घेणे महत्वाचं आहे. 'एआय'ला घाबरण्याच कारण नाही, माणसाने सतत नवीन शिकलं पाहिजे. नवीन कौशल्य शिकणं, सातत्याने शिकत राहणे महत्वाचे.

'एआय'ला घाबरू नका, 'एआय' येत असलेल्या माणसाला घाबरा. कारण तो आपला स्पर्धक असेल. आपल्या पुढे 'एआय'चं आव्हान आहे, रास्त काळजी घेतली तर 'एआय' हे संकट नाही तर वरदान आहे. त्याच्या वापराने आपल्या क्षेत्रात कितीतरी अधिक पटीने प्रगती साधता येईल. संजीवनीच्या आनंद पाटील यांनी प्रास्ताविक करताना प्लास्टिक संकलन केंद्राची माहित देऊन प्लास्टिक निर्मुलनासाठी सहकार्य करण्याचं आवाहन केलं व संजीवनी अभ्यासिका, स्टडी सेंटरची माहिती दिली आणि पाहुण्याचं स्वागत केले. अध्यक्षस्थानी प्रा.संकेत पाटील होते. सुरवातील सौ रीमा नाईक, कौस्तुभ पाटील, अनंत नाईक यांनी ईशस्तवन सादर केलं. विनिता नाईक यांनी सुरेख सूत्रसंचालन केले.

### पालघरचे सीडबॉल मॅन दीपक देसले ...

१३ जिल्ह्यांत लातूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, रायगड, नवी मुंबई, अमरावती, अकोला, नांदेड, कोपरगाव आदी ठिकाणी बियांची पाठवणी करण्यात आली आहे. या बिया विद्यार्थ्यांच्या हातून शेकडो शाळांमध्ये सीड बॉलमध्ये रूपांतरित होणार आहेत. या उपक्रमाची सुरुवात टोकेपाडा, घोलवड येथे झाली होती. पहिल्या वर्षी १०,०००, दुसऱ्या वर्षी २३,०००, तर तिसऱ्या वर्षी डहाणू, तलासरी, पालघर तालुक्यातील १७ पर्यावरणप्रेमी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली १८०० विद्यार्थ्यांनी १,१७,००० सीड बॉल तयार केले होते. लिलकपाडा कोसबाड शाळेतील ४६ विद्यार्थ्यांनी केवळ चार दिवसांत ४४,००० सीड बॉल तयार करून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या उपक्रमात 'आनंददायी शनिवार' व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक शुभेच्छा दिल्या.बियांचे संकलन हे अत्यंत सूक्ष्मपणे आणि प्रेमाने केले गेले. लिलकपाडा शाळेतील मुलांनी बेहडा, आपटा, बहावा, चिंच, लाजरा, रिठा, बेल आदी स्थानिक बिया गोळा केल्या. शिवण, रक्तचंदन, ढोरगुंज, गुंज, खैर, बांबू, चिलार, सीताफळ, कोसुंब, करंज, अभय, बिबवा, विलायती चिंच, कांडोळ, आकेशा इत्यादी बिया वडेश्वर महादेव ट्रस्ट बडोदा येथील अवधूत नगरकर आणि वैशाली रा. पाटील यांच्याकडून देणगीस्वरूपात मिळाल्या. परिणामी, ३०-३२ प्रकारांच्या बियांचा समावेश असलेली एक भव्य 'सीड बँक' उभी राहिली. या कामात यामिनी करबट, ग्रामस्थ, पालक व शाळेतील विद्यार्थी यांनी मनःपूर्वक सहभाग घेतला. या हरित मोहिमेत अनेक शाळांनी योगदान दिले आहे. सूर्यनगर हायस्कूलचे अंभिरे सर, वाघाडी हायस्कूलचे सोनवणे सर व संतोष अंकारम, बोर्डी येथील स्मिता ठाकूर मॅडम, चिंबवे ब्राह्मण येथील छाया पाटील, पंकज नरवडे, शशिकांत ईशी, उल्हास देसले, अमोल तिजारे, ज्ञानेश्वर सरक, बिर्जे सर, पंकज पाटील (भिनारी), अर्चना चौधरी, धुमाळ सर, साधना भानुशाली (वाडा) यांचा सहभाग विशेष उल्लेखनीय आहे. या संपूर्ण उपक्रमाचा एकमेव हेतू - विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवेदनशीलता रुजवणे आणि भविष्यासाठी हिरवळ तयार करणे. हे केवळ बीज नव्हे, तर आशेची रुजवणूक आहे.

क्राईम संध्या | सोमवार दि. ५ मे २०२५ ते रविवार दि. ११ मे २०२५ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ७

# अर्नाळा समुद्र किनाऱ्यावर घाणीचे साम्राज्य

## ट्रॅक्टर बिच क्लीन मशीन अर्नाळा ग्रामपंचायतीसमोर धुळखात






**विरार/प्रतिनिधी**

विरारचा अर्नाळा समुद्र किनारा घाणीच्या विळख्यात सापडला आहे. अनेक महिन्यांपासून किनाऱ्यावर साफसफाई झाली नसल्यामुळे सर्वत्र ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे. किनारा साफसफाई करण्यासाठी अर्नाळा ग्रामपंचायतीला महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने ट्रॅक्टर बिच क्लीन मशीन दिली आहे. तरीही ग्रामपंचायतीकडून या यंत्रणेचा वापर किनारा साफसफाईसाठी केला जात नसल्याचे चित्र दिसून आले आहे. विरार पश्चिमेकडील अर्नाळा समुद्रकिनारा साफसफाई करण्यासाठी मनुष्यबळाच्या ऐवजी यंत्रणेचा वापर केला जाणार होता. २३ ऑगस्ट रोजी बिच क्लीन मशीनचे उद्घाटन अर्नाळा समुद्र किनारी करण्यात आले होते. समुद्र किनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता यांत्रिक पद्धतीने होणार होती. यामुळे अर्नाळा समुद्रकिनारा स्वच्छ राहील असा विश्वास व्यक्त केला जात होता. मात्र सध्या समुद्रकिनारा घाणीच्या विळख्यात सापडला आहे. त्यामुळे या किनाऱ्याकडे पर्यटकांनी पाठ फिरवली आहे. सामाजिक संस्थांच्या मदतीने समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता मोहीम राबविली जाते. मात्र यात सातत्य राखणे अवघड असल्याने किनारे अस्वच्छ राहण्याचे प्रमाण मोठे होते. याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियामक मंडळाने पहिल्यांदाच अर्नाळा समुद्र किनाऱ्याच्या स्वच्छतेसाठी अधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली आहे. मात्र यंत्रणा अर्नाळा ग्रामपंचायतीसमोर धुळखात पडली आहे. दरम्यान ही मशिन ट्रॅक्टरच्या सहाय्याने समुद्रकिनारी वापरता येणार होती. समुद्र किनाऱ्यावरील रेती चाळून त्यातील कचरा साफ करण्याचे काम या माध्यमातून करता येणार होते. या मशिनच्या माध्यमातून समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता केली जाणार होती. कचरा उचलणे, त्याचे संकलन करणे, संकलित केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे, वाळूत साचलेल्या कचऱ्याचे संकलन करणे, वाळूचे सपाटीकरण करणे यासारखी कामेही केली जाऊ शकणार होती. यंत्राच्या देखभाल दुरुस्तीचा खर्चही कंपनीच्या माध्यमातून केला जाणार होता.

# महिलेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस २९ दिवसांत शिक्षा

**पालघर/प्रतिनिधी**

केळवे रोड परिसरात एका महिलेसोबत छेडछाड व विनयभंग केल्याप्रकरणी आरोपीला अवघ्या २९ दिवसांत शिक्षा सुनावण्यात आली असून, ही कारवाई पालघर पोलिसांसाठी उल्लेखनीय ठरत आहे. दिनांक ३० मार्च २०२५ रोजी रात्री ८.३० वाजता धोंदलपाडा, केळवे रोड (पूर्व) येथे पीडित महिला टिकली तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल घेऊन पायी जात असताना, आरोपी ओमकार संतोष जाधव याने तिच्या अंगावर धाव घेत, तोंड दाबून, मान पकडून अडवले. महिलेने प्रतिकार करून स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न केला, परंतु आरोपीने तिच्या साडीला मागून पकडून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. फिर्यादीवरून सफाळा पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४०/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७४ अंतर्गत ३१ मार्च २०२५ रोजी दाखल करण्यात आला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सपोनि दत्ता शेळके (प्रभारी अधिकारी, सफाळा पोलीस ठाणे) यांच्या मार्गदर्शनाखाली, तपासिक अंमलदार पोना बी. के. भावर यांनी २४ तासांच्या आत पुरावे गोळा करून १ एप्रिल २०२५ रोजी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. मा. प्रथमवर्ग न्यायाधीश के.जी. सावंत यांनी सरकारी वकील श्रीमती आशा मारवाडी यांच्या युक्तिवादावर आधारित निकाल देत, दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी आरोपीस १ वर्ष सश्रम कारावास व ५,०००/- रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय अधिकारी अभिजीत धाराशिवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दत्ता शेळके, कोर्ट पेरवी अधिकारी सपोउनि व्ही.पी. भोये, सपोउनि महेंद्र शर्मा, पोहवा के.बी. शेळके, पोना बी.के. भावर, मपोना एन.टी. गावित व पोअं ए.बी. मोधे यांनी केली.

# गुंज येथील पांडवकालीन परशुराम मंदिराला खा.डॉ. हेमंत सवरा यांची भेट



**वाडा :** अक्षय तृतीयेला या मंदिराच्या परिसरात मोठा उत्सव असतो या उत्सवानिमित्ताने पालघर लोकसभेचे खासदार डॉ.हेमंत सवरा यांनी हजेरी लावली. पुरातन काळापासून अस्तित्वात असलेले वाडा तालुक्यातील गुंज या गावी बालयोगी परशुरामाचे मंदिर मंदाग्नी डोंगरावर वसलेले आहे. हे मंदिर पांडवकालीन असल्याने या मंदिराला विशेष महत्त्व आहे. या मंदिराचा विकास व्हावा या उद्देशाने मंदिराच्या परिसरात सभा मंडपाचे उद्घाटन डॉ.हेमंत सवरा यांच्या हस्ते करण्यात आले त्याच्या बरोबर गुंज ग्रामपंचायत हद्दीतील अनेक विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. या प्रसंगी त्यांच्या समवेत जेष्ठ नेते बाबजी काठोळे, माजी जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील, कुडस मंडळ अध्यक्ष मोनिष पाटील माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शशिकांत पाटील, गिरीश चौधरी, तालुका अध्यक्ष मंगेश पाटील, गुंज ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रियांका पाटील, सारशी ग्रामपंचायतीचे सरपंच ड. दिनेश कोदे, व गुंज गावचे युवा नेतृत्व पंकज पाटील व सर्व सदस्य उपस्थित होते.

# शिवण कला केंद्र व सॅनिटरी पॅडचे वाटप



**वाडा :** वाडा तालुक्यातील वावेघर येथील स्वामी समर्थ मंदिर येथे ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमी करणा साठी त्यांना मोफत शिवण कला शिकता यावी या उद्धेशाने स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शिवण कला केंद्राचे उद्घाटन स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष कमलाकर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित महिलांना मोफत सॅनिटरी पॅडचे वाटपचे करण्यात आले. सदर शिवण कला केंद्राच्या उदघाटन प्रसंगी स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष कमलाकर पाटील, समाजिक कार्यकर्ते श्याम ठाकरे, गोवर्धन पटेल, सानिका गगे (शिवण कला शिक्षिका), अमृता ठाकरे सरपंच वावेघर, मयुरी पाटील, साक्षी ठाकरे, रुचिता ठाकरे, वृषाली ठाकरे, मनीषा वारघडे, सारिका मानकर आदी उपस्थित होते.

# वाडा ग्रुप सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमन पदी शरद पाटील, तर व्हाईस चेअरमन पदी शरद सोनटक्के यांची निवड

**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील सर्वात मोठी व सर्वात जुनी सहकारी संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाडा ग्रुप सेवा सह. सोसायटीच्या चेअरमन पदाच्या निवडणूकीकडे पूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. मात्र आज दि. ३० एप्रिल रोजी झालेल्या निवडणूकीमधे तालुक्यातील आदर्श शेतकरी व सुशवी ग्रो या नामांकीत कृषी संस्थेचे संचालक शरद यशवंत पाटील यांची सर्व संचालकांनी बिनविरोध चेअरमन पदावर निवड केली. तर व्हाईस चेअरमन पदावर ज्येष्ठ संचालक शरद सोनटक्के यांचीही निवड बिनविरोध झाली.

शरद पाटील हे सलग तिसऱ्यांदा संचालक पदावर बिनविरोध निवडून आलेले आहेत. या पूर्वीही ते संस्थेचे व्हाईस चेअरमन व चेअरमन पदावर कार्यरत होते. या संस्थेमधे वाडा शहरासह एकूण २४ गावांचा समावेश होत असून एकूण १७५० सभासद आहेत. संस्थेची वार्षिक उलाढाल १२ कोटींची असून ८ ते १० कोटींपर्यंत सभासदांना कर्जाचे वाटप दरवर्षी केले जाते. संस्था सर्वात जुनी असून २४ एप्रिल १९२९ रोजी इंग्रजांच्या काळात या संस्थेची स्थापना झालेली आहे. संस्थेचा कारभार पारदर्शकरित्या राबवला जात असून शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जातात, असे नवनिर्वाचित चेअरमन शरद पाटील यांनी सांगितले. २४ गावांच्या या संस्थेच्या १३ संचालकांचीही निवड बिनविरोध झालेली आहे.

# वाड्यात अक्षय तृतीया निमित्त शिवजयंती उत्साहात साजरी

**वाडा/प्रतिनिधी**



शिवसेना (उबाठा) वाडा शाखेच्या वतीने अशोकवन येथील अशोकगड येथे अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावर शिवजयंती निमित्त शिवपूजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शिवसेना नेत्या ज्योती ठाकरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शिवचरित्राचा माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज घराघरात पोहचणे, त्यांचे विचार, त्यांचा इतिहास प्रत्येक घटकांपर्यंत पोहचवणे ही काळाची गरज असल्याचे मत ज्योती ठाकरे यांनी व्यक्त केले. स्वर्गीय धर्मवीर आनंद दिघे यांनी अक्षय तृतीयाच्या दिवशी शिवजयंती साजरी करण्याची परंपरा चालू केली असून वाडा शहर शाखेकडून दरवर्षी उत्साहात साजरी केली जाते. शिवसेनेचे (उबाठा), ज्योती ठाकरे, ठाणे जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष कुंदन पाटील, पालघर जिल्हाप्रमुख अनुप पाटील जिल्हा संपर्क प्रमुख निलेश गंधे, जिल्हा समन्वयक प्रकाश केणे, तालुका अध्यक्ष निलेश पाटील, शहर अध्यक्ष प्रमोद घोलप, माजी नगराध्यक्षा गीतांजली कोलेकर, माजी नगरसेवीका वर्षा गोळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून वाडा पंचायत समितीच्या सभापती अस्मिता लहांगे, माजी नगरसेवीका विशाखा पाटील, भारती सापटे, अंजली पाटील, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रफुल पाटील, भाजपचे उपजिल्हा अध्यक्ष संदीप पवार, मनसेचे तालुका अध्यक्ष कांतिकुमार ठाकरे, लिटिल अँजल स्कुलचे संचालक देवेंद्र भानुशाली, पत्रकार युवराज ठाकरे, वैभव पालवे, अ‍ॅड. ऋषीकेश सांवत आदी उपस्थित होते. आलेल्या पाहुण्यांचे मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन स्वागत, सत्कार करण्यात आला. तर सायंकाळी जयंतीनिमित्त वाड्यातील अशोकगड येथून मिरवणूक निघून आगर आळी, वानी आळी, परळी नाका, मुख्य बाजारपेठ, बस स्थानक, खंडेश्वरी नाका ते पुन्हा अशोकगड अशी भव्य मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणूकीत घोड्यावर स्वार झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे हुबेहूब दर्शन झाले. मिरवणुकीत ऐतिहासिक वेशभूषेत मावळे, घोडे हे विशेष होते तर तारफा नृत्याने सर्वांचे लक्ष केंद्रित केले होते.

# वाडा बस स्थानकात पाणपोईची सोय




**वाडा :** वाडा बस स्थानकातील पाणपोई नादुरुस्त झाल्याने प्रवाशांना पिण्याचे पाणी विकत घेण्याची वेळ आली होती. बातमी २३ एप्रिलच्या अंकात प्रशिद्ध झाली होती या बातमीची दाखल चार्मोद्याग कामगार सेनेचे ठाणे, पालघर जिल्याचे जिल्हा अध्यक्ष भरत गायकवाड यांनी घेऊन जगदंबा कंपनीचे मालक मालपाणी यांच्याकडून वॉटर कूलर आरो सिस्टम नागरीक व प्रवाश्यांसाठी उपलब्ध करून दिला आहे. या पाणपोई मुळे नागरिक व प्रवाश्यांना २४ तास थंड व स्वच्छ पिण्याचे पाणी मिळणार आहे. कामगार दिनाचे औचित्या साधून गुरुवारी (१ मे) पाणपोईचे लोकार्पण जगदंबा कंपनीचे व्यवस्थापक सुशील तायडे यांच्या हस्ते करण्यात आले या यावेळी वाडा आगाराचे कर्मचारी तसेच नितीन गायकवाड, वैभव गायकवाड, कैलास गायकवाड, सुनील गायकवाड, सूचित गायकवाड, दिवेश गायकवाड व प्रवासी उपस्थित होते.

# विरार येथे साहित्य चावडीवर ‘वसंत फुलला’



**विरार/प्रतिनिधी**

साहित्य चावडीच्या ६८ व्या पुष्पात वसंत ऋतुच्या आगमनाच्या निमित्ताने वसंत फुलला हा आगळा वेगळा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे भारतीय नागरिकांवर पाकिस्तानने केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करून त्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या भारतीय नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. वसंत ऋतूत झाडांना नव्याने पालवी फुटते, रंगीबेरंगी फुलांच्या बहर येतो पक्षांचा सकाळी छान किलबिलाट अशा वातावरणात साहित्यिकांच्या मनाला ही नव्या विचारांची पालवी फुटते आणि मग साहित्य चावडीवर वसंत फुलतो. यंगस्टार्सचे अध्यक्ष लोकनेते हितेंद्र ठाकूर व आजीव पाटील यांच्या सहकार्याने चावडी गेले सात वर्षे झाले मंगलमुर्ती मंदिरात बहरत आहे. विशेष सहकार्य समाजसेवक किरण ठाकूर यांचे आहे. साहित्य चावडीचे सरपंच पद प्रख्यात गझलकार डॉ. के.डी.संखे यांनी भूषविले, त्यांनी रसिकांना मार्गदर्शन करत गझलेतून रसिकांची वाहवा मिळवली. सुजाता साळवी, नभा पाटील, मानसी शिगवण, स्वाती नाईक, सुरेश घरत, सुभाष चौधरी (सफाळे), सुचित्रा पितळे, मेघना क्षीरसागर, मधुकर तराळे, विक्रांत केसरकर, हरिश्चंद्र मिठबावकर यांनी वसंत ऋतूवर सुंदर रचना सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. तसेच संजना वेतुरकर हिंदी गीत गात सुंदर असे नृत्य पेश केले, गीताश्री नाईक यांनी ‘मोगरा फुलाला’ हे सदाबहार गीत सादर केले. अर्चना जुवाटकर यांनी अमेरिकेतून वसंत ऋतुवर केलेली आपली रचना रेकॉर्डिंग करून पाठवली हे या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य ठरले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुकर तराळे यांनी केले तर सुसंवादक विक्रांत केसरकर यांनी श्रोत्यांशी अभ्यासपूर्वक संवाद साधला. सौ सुरेखा कुरकुरे, मधुकर तराळे, विक्रांत केसरकर, दिपाली जाधव, हरिश्चंद्र मिठबावकर यांनी मैफिलीत मेहनतीचे रंग भरले आणि वसंत ऋतुच्या वातावरणात साहित्य चावडी नवयौवनाप्रमाणे तजेलदार, बहारदार भासू लागली.

# सिमेंटचे ब्लॉक बनविणाऱ्या कंपनीत ड्रग्ज कारखाना!

**वसई/प्रतिनिधी**

वसई येथील सिमेंटचे ब्लॉक बनविण्याच्या कंपनीतून सुरू असलेला मेफेड्रॉन (एमडी) बनविण्याचा कारखाना साकीनाका पोलिसांनी उद्ध्वस्त केला. या कारवाईत चार किलो ५३ ग्रॅम एमडी ड्रग्ज हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला. त्याची किंमत आठ कोटी चार लाख रुपये आहे. पोलिसांनी या कारवाईत सादिक सलीम शेख (२८) आणि सिराज सुलतान पंजवानी (५७) यांना अटक केली आहे. साकीनाका पोलिसांचे अमली पदार्थविरोधी पथक गस्त घालत असताना येथील काजुपाडा परिसरातील रेतीवाला कंपाऊंडमध्ये सार्वजनिक शौचालयाजवळ सादिक हा संशयास्पदरीत्या फिरताना सापडला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याजवळ १० लाख सात हजार रुपये किमतीचे ५३ ग्रॅम एमडी ड्रग्ज सापडले. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून सादिकला अटक केली. त्याच्या चौकशीत त्याने एका व्यक्तीकडे एमडी विक्रीचे काम करत असल्याचे आणि त्याला मिरा रोडमधील रहिवासी सिराज पंजवानी हा अमली पदार्थ पुरवत असल्याची महत्त्वपूर्ण माहिती दिली. साकीनाका पोलिसांनी आरोपी पंजवानी याचा मिरा रोडमध्ये शोध घेऊन त्याला २६ एप्रिल रोजी अटक केली. वसईतील कामण गावातील काळुराम चौधरी हा एमडी बनवून विकत असल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार, साकीनाका पोलिसांनी चौधरी चालवत असलेल्या एम. के. ग्रीन एएसी ब्लॉक कंपनीवर छापा टाकला. सिमेंटचे ब्लॉक बनविणाऱ्या या कंपनीत चौधरी सापडला नाही. पण पोलिसांना येथील एका शेडमध्ये एमडी अमली पदार्थ बनवले जात असल्याचे दिसले. या शेडमधून चार किलो एमडी आणि एमडी बनवण्याचे साहित्य जप्त केले.

# कामगाराच्या हस्ते झेंडावंदन संपन्न



**वाडा :** आबिटघर ग्रामपंचायतच्या सरपंच साक्षी संतोष साठे या नेहमीच आपल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या सन्मानासाठी पुढाकार घेऊन विविध संकल्पना राबवत असतात. गुरुवारी (दि.१) मे महाराष्ट्र दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालयातील झेंडावंदनाचा सन्मान त्यांनी गावातील कामगारांच्या सन्मानार्थ जेष्ठ कामगार तथा गावातील प्रतिष्टीत व्यक्तिमत्व हभप सतीश दूंदाराम पाटील (भाऊ) यांना आपल्या अधिकाराचा वापर करून दिला. ग्रामपंचायत कार्यालयच्या वतीने सरपंच साक्षी साठे तसेच उपसरपंच सुप्रिया पाटील व ग्रामपंचायत अधिकारी संजय पाटील यांनी प्रथम त्यांचे स्वागत करून सत्कार केला व त्यानंतर त्यांच्या शुभहस्ते झेंडा फडकवण्यात आला. सोबतच माध्यमिक विद्यामंदिर अबिटघर येथे सरपंच महोदया साक्षी साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहन करून महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. या शुभ प्रसंगी माध्यमिक विद्यालय आबिटघरचे मुख्याध्यापक दिलीप पाटील सर,ग्रामपंचायत सदस्य भरत जाधव, कुलदीप पाटील, धनश्री पाटील, कल्याणी साठे, भावना रायात, निखिल पाटील, स्मिता चिमडा, मनीषा मुकने, कल्पेश आमले, सन्मानीय ग्रामस्थ, शाळेतील शिक्षक, विध्यार्थी तसेच ग्रामपंचायत कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# मासिक पाळीबाबत मार्गदर्शन सत्र संपन्न




**वाडा/प्रतिनिधी**

उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई यांच्या मार्फत वाडा तालुक्यातील वावेघर येथे ग्लोबल फाऊंडेशनच्या वाडा युनिटच्या वतीने मासिक पाळीत घ्यावायची स्वछता, काळजी या बाबत जनजागृती करण्यातच्या उद्देशाने विशेष सत्राचे उत्कर्ष फाऊंडेशनच्या प्रशिक्षका प्रणाली पाटील यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. महिलांच्या आरोग्याच्या हेतूने केलेल्या या उत्कर्षच्या उपक्रमाला महिलांनी उत्तम प्रतिसाद दिला. याप्रसंगी वावेघर ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते.

# उमेळमान क्रिकेट क्लब स्व.सतीश वर्तक स्मृती चषकाचे मानकरी

**वसई : वार्ताहर**




मॉर्निंग क्रिकेट क्लब तर्फे स्व. सतीश (नाना) वर्तक स्मृतिचषक दोन दिवसीय स्पर्धेचे आयोजन वसईच्या चिमाजी आप्पा मैदानावर करण्यात आले होते. हे स्पर्ध्येचे ३४ वे वर्ष होते. या स्पर्ध्येत ८ संघानी सहभाग घेतला होता. स्पर्धेत मोठ्या प्रमाणात रणजीपट्टुनी सहभाग घेतल्याने अतिशय चुरशीच्या या स्पर्ध्येत उमेलमान क्रिकेट क्लब विजेता ठरला तर विरारचा साईनाथ क्रिकेट क्लब उपविजेता ठरला. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी उदघाटनापूर्वी पहेलगाम येथे अतिरिकीयांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्याना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांना निवृत्त स्थापत्य अभियंता आणि सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र लाड आणि वसई विकास सहकारी बँकेचे विद्यमान संचालक अवनीश वर्तक यांचे हस्ते स्पर्ध्येचे उदघाटन झाले. यावेळी सतीश नाना यांच्या पत्नी शुभांगी वर्तक या उपस्थित होत्या तर स्पर्धेचा बक्षीस समारंभ माजी रणजीपट्टू प्रदीप कासलीवाल, मुंबई क्रिकेट असोशिएशनची प्रशिक्षक सचिन कोळी, माजी महापौर प्रवीण शेट्टी आणि मॉर्निंग क्रिकेट कलुबचे अध्यक्ष तसेच वसई विकास बँकेचे चेअरमन आशय राऊत यांच्या उपस्थितीत पार पडला स्पर्धेत उत्कृष्ट फलन्दाज म्हणून जय बिस्त, उत्कृष्ट गोलन्दाज परीक्षित, मॅन ऑफ द मॅच जय बिस्त याची निवड करण्यात आली. या स्पर्ध्येत अंतिम सामना चांगलाच रंगला होता. रणजीपट्टू रॉयलस्टन डायस याने २ ओवर मध्ये २४ रन देऊन ३ विकेट घेतल्या, तर जय बिस्त याने ३० चेंडूत ७५ धावांची खेळी खेळ्याने उमेलमान क्रिकेट क्लब विजयी झाले. यावेळी. जेष्ठ क्रिकेटपट्टू चंद्रकांत खंडागळे व विवेक पाटील यांचा सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर उदोयोन्मुख खेळाडू म्हणून मुंबई क्रिकेट टीम आणि आता चेन्नई सुपर किंगचा सलामीचा फलन्दाज आयुष्य म्हात्रे याचे अभिनंदन करण्यात आले तर आयुष्य वर्तक रिया चौधरी यांचा हि यावेळी सन्मान करण्यात आला.

04 TO 11 MAY 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 5/3/2025 8:09 PM Page 1



### सात कलमी कार्यक्रमांतर्गत १०० दिवसांचे मूल्यमापन

# पालघर जिल्हा पोलीस दल ठरलं महाराष्ट्रात नंबर वन!





**पालघर/प्रतिनिधी**

१०० दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये पालघर पोलीस दलाने उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे पालघर पोलीस दलाने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. या अगोदर कार्यालयीन सुधारणांच्या मोहिमेत पालघर पोलीस दल प्रथम आले होते. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचा १०० दिवसाच्या ७ कलमी कार्यक्रम हा संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पालघर पोलीस दलाकडून जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रात हा ७ कलमी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या १०० दिवसाच्या ७ कलमी कार्यक्रमामध्ये वेबसाईट, सुकर जीवनमान, स्वच्छता, तक्रार निवारण, कार्यालयीन सोई सुविधा, आर्थिक व औद्यागिक गुंतवणुकीस प्रोत्साहन, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी इत्यादी विषय आहेत. पालघर जिल्हा पोलीस दलाकडून पोलीस प्रशासन लोकाभिमुख व गतीमान करताना संकेतस्थळ अद्ययावत करून युजर फ्रेंडली बनवली, नागरिकांसाठी चॅट बॉक्स सुविधा, सुकर जीवनमान अंतर्गत सायबर सुरक्षित पालघर मोहिम, एआय अंतर्गत चॅटबोट, स्वच्छता मोहिम, तक्रार निवारण दिन, ई-ऑफिस कार्यप्रणाली, डिजिटल मॅनेजमेंट सिस्टम, कार्यालयीन कामकाजामध्ये एआय चा वापर, पेट्रोलिंगवर देखरेखीसाठी थर्ड आय ॲप्लीकेशन असे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले आहेत. या ७ कलमी कार्यक्रमाअंतर्गत भारतीय गुणवत्ता परिषदेकडून १०० दिवसांचे मुल्यमापन करण्यात आले होते. त्यामध्ये पालघर पोलीस दलास १०० गुणांपैकी ९०.२९ गुण प्राप्त झाले आहेत. त्यामुळे १०० दिवसांच्या कार्यालयीन मुल्यमापनानंतर पोलीस विभागातून महाराष्टातील एकूण ३४ जिल्हा पोलीस दलामधून पालघर जिल्हा पोलीस दलाने पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या अगोदर देखील ५० दिवसांच्या कार्यालयीन मुल्यमापनामध्ये पालघर ...पान ६ वर

# पोलीस उप अधिक्षक मनीष कल्याणकर यांना पोलीस महासंचालक पदक प्रदान!

**अहमदपूर/फिरोज शेख**



येथील उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष कल्याणकर यांना महाराष्ट्र शासन पोलीस विभागाच्या वतीने देण्यात येणारा पोलीस महासंचालक पदक लातूरचे पालकमंत्री नामदार शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोयम मुंडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, सौ मनीषा कल्याणकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. पोलीस दलात कार्य करताना गुन्ह्याचा तपास योग्य रीतीने करून आरोपींना शिक्षेस पात्र ठरविणे. गंभीर गुन्ह्यातील आरोपींना त्वरित अटक करणे, कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करणे, विविध प्रकाराच्या गुन्ह्यात आरोपींना शिक्षा होण्यासाठी पाठपुरावा करणे, सराईत गुंडांना चकमकीत ठार करणे या सह पोलीस प्रशासनातील इतर महत्त्वपूर्ण आणी उल्लेखनीय कार्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष कल्याणकर यांना महाराष्ट्र शासनाच्या पोलीस विभागाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२४ चा पोलीस महासंचालक पदक जाहीर करण्यात आले होते. त्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, यांच्यासह पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व मित्रपरिवाराने अभिनंदन आणि कौतुक करून पुढील कार्याला शुभेच्छा दिलेल्या आहेत.

# जी गोष्ट मानवी मेंदू करू शकतो ती गोष्ट 'एआय' करू शकते -अतुल कहाते




**वसई/प्रतिनिधी**

'एआय'ला भावना असू शकतात. मानवाच्या भावना आणि 'एआय'च्या भावना ह्यात फरक आहे. मानवाच्या भावना आतून स्फुरलेल्या असतात, परतू 'एआय' मध्ये त्या प्रतिबिंबित होऊ शकतात, असे प्रतीपादन अतुल कहाते यांनी संजीवनी व्याख्यानमाला २०२५ मध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) नव्या युगाची सुरुवात या विषयावर बोलताना उमराळे येथे केले. ते पुढे म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेचा ७५ वर्षाचा इतिहास आहे. यश, अपयश ह्या लाटेवर त्याचा प्रवास सुरु आहे. याची सरुवात एलन टुरिंगपासून झाली. सुरवातील संगणकात मानवी मेंदूची माहिती भरा अशी पद्धत होती. नंतर मानवी मेंदूचे अभ्यासक, नोबल प्राईज विजेते जेफ्री हिंटन यांनी यात बदल सुचवला. मानवी मेंदू कसं काम करतो हे संगणकाल शिकवा. त्यातून कृत्रिम न्यूरल नेटवर्क विकसित झालं. आपण देत ...पान ६ वर

# क्रांतीवीर राघोजी भांगरे यांचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करा; खासदार डॉ. हेमंत सवरा यांची मागणी





**पालघर/प्रतिनिधी**

अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, नवी दिल्ली (मुंबई/कोकण विभाग) महाराष्ट्र शाखा यांच्या वतीने आदिवासी कोळी महादेव समाजातील आद्य क्रांतीवीर राघोजी रामजी भांगरे (भांगरा) यांच्या १७७ व्या स्मृतिदिनानिमित्त ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके, पालघरचे खासदार डॉ. हेमंत विष्णु सवरा, ठाण्याचे आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे, आ. वैभव पिचड, सचिन खेवरा, भूयाल, संतोष साठे, जगन कुवर, तसेच विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रांतीवीर राघोजी रामजी भांगरे हे स्वातंत्र्य संग्रामापूर्वीच ब्रिटीश सत्तेविरोधात सशस्त्र उठाव करणारे महाराष्ट्रातील आद्य स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांनी रयतेसाठी अन्यायाविरुद्ध लढा दिला आणि आदिवासी समाजात जागृती निर्माण केली. त्यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण परिसरात ब्रिटिशांविरुद्ध अनेक चळवळी झाल्या. त्यांच्या क्रांतिकारी कार्यामुळे २ मे १८४८ रोजी त्यांना ठाणे मध्यवर्ती कारागृहात फाशी देण्यात आली. त्यांच्या त्यागाचे स्मरण हा अभिवादन सोहळ्याचा केंद्रबिंदू ठरला.

खा. डॉ. हेमंत सवरा यांनी, राघोजी रामजी भांगरे यांचा इतिहास नव्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी यावेळी केली. डॉ. सुनील पराड यांनी ठाणे मध्यवर्ती कारागृहास क्रांतीवीर राघोजी रामजी भांगरे यांचे नाव देण्यात देऊन कारागृहा समोरील चौकात त्यांचा पुतळा उभारावा, अशी विनंती केली. यावर प्रतिक्रिया देताना, आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी या सर्व मागण्यांचा पाठपुरावा करून त्या लवकरच पूर्ण करण्यात येतील, असे आश्वासन दिले. तसेच आदिवासी विभागातील काही योजना क्रांतीवीर राघोजी रामजी भांगरे यांच्या नावाने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ठाणे मध्यवर्ती कारागृह येथील वधस्तंभाला विनम्र अभिवादन करून त्यांच्या बलिदानाचे स्मरण केले.






# पालघरचे सीडबॉल मॅन दीपक देसले यांचा हरित क्रांतीचा निर्धार

## महाराष्ट्र दिनी ५ लाख सीड बॉल निर्मितीचा संकल्प; हिरवी क्रांती सुरू

**पालघर/प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याच्या ६५व्या स्थापना दिनानिमित्त 'पर्यावरण वाचवा, वसुंधरा सजवा' या उपक्रमांतर्गत पालघर जिल्ह्यात एक आगळीवेगळी हिरवी क्रांती सुरू झाली आहे. या दिवसाचे औचित्य साधून जिल्ह्यातील विविध स्पर्धांतील विजेत्यांचा सन्मान महाराष्ट्र राज्याचे वनेमंत्री व पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या शुभहस्ते, खासदार डॉ.हेमंत सवरा, जिल्हाधिकारी डॉ इंदूराणी जाखर, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, तसेच इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. विजेत्यांना प्रशस्तीपत्रासह 'सीड बॉलचा डबा' देऊन गौरवण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी सोनाली मातेकर, संगीता भागवत तसेच इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.या उपक्रमामध्ये चर्चेत येणारे नाव म्हणजे 'सीडबॉल मॅन' दीपक देसले यांचे. जिल्हा परिषद शाळा लिलकपाडा, कोसबाड (ता. डहाणू) येथे कार्यरत असलेले हे पर्यावरणप्रेमी शिक्षक मागील चार वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या आणि गावकऱ्यांच्या सहकार्याने बीज गोळ्यांची क्रांती घडवत आहेत. यंदा त्यांनी तब्बल ५ लाख सीड बॉल निर्मितीचा संकल्प केला आहे. त्यांच्या पुढाकाराने सीड बॉल महोत्सव ४.० अंतर्गत यंदा राज्यभरातील ...पान ६ वर

# पालकमंत्र्यांच्या हस्ते 'कोळगाव येथे कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू' अभियानाचा शुभारंभ



**पालघर/प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या आदेशानुसार पालघर जिल्ह्यात कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू! हे विशेष स्वच्छता अभियान आजपासून सुरू झाले असून, या अभियानाचा शुभारंभ कोळगाव येथे पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते आज पार पडला. ओला व सुका कचरा कंपोस्ट खड्ड्यामध्ये टाकून पालकमंत्री तसेच इतर मान्यवरांनी या अभियानाचा शुभारंभ केला. खासदार डॉ.हेमंत सवरा, जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखर, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, निवासी जिल्हाधिकारी, सुभाष बागडे, प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते, कोळगाव सरपंच कुणाल चंद्रकांत पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इजाज अहमद शरीख मसलत, पाणी व स्वच्छता विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल पारसकर, गट विकास अधिकारी बापूराव नाळे, उपसरपंच किरण संखे, सदस्य योगेश पाटील, दिलीप कोळेकर, नैनीता पाटील,मेघुल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या वेळी पालकमंत्र्यांनी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. तसेच ग्रामीण भागात घनकचऱ्याचे व्यवस्थापन, कंपोस्ट निर्मिती व पर्यावरण पूरक उपाययोजना ही काळाची गरज असून अशा अभियानांमुळे गावपातळीवर स्वच्छतेची चळवळ अधिक बळकट होईल, असे त्यांनी यावेळी नमूद केले. या अभियानाचा उद्देश ग्रामीण भागातील ओल्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून कंपोस्ट व गांडूळ खत निर्मिती करणे आहे. हे अभियान १ मे ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत प्रभावीपणे राबवले जाणार आहे. या वेळी कोळगाव ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या कार्यक्रमात घंटागाडीचे उद्घाटन, ओला व सुका कचरा वेगळा ठेवण्यात येणाऱ्या कचरा पेट्यांचे वाटप, तसेच प्लास्टिक मुक्तीचा संदेश देणाऱ्या पिशव्यांचे वाटप ग्रामपंचायत मार्फत करण्यात आले.तंटामुक्ती अध्यक्ष, मेहुल पाटील, ग्रामपंचायत अधिकारी, जितेंद्र पवार,मंडळ अधिकारी वायकर, तलाठी चुरी, गावस्तरीय कर्मचारी आणि ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.